MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सतरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१६

## संपादकीय

### चार भिंतींबाहेरचे शिक्षण

**आचार्य पादम आदते। पादम अन स्वमेश्वया।।**
**पादम सब्रह्मचारिभ्य। पादम कालेन पच्चते।।**

असे एक संस्कृत वचन आहे. याचा अर्थ असा : आपल्याला आचार्यांकडून साधारणपणे एक चतुर्थांश ज्ञान मिळते. एक चतुर्थांश ज्ञान आपण आपल्या प्रयत्नाने मिळवितो, एक चतुर्थांश ज्ञान आपल्याला सवंगड्यांकडून मिळते, तर उरलेले एक चतुर्थांश ज्ञान आपण रोजच्या अनुभवांतून मिळवितो. आजच्या भारतीय शिक्षण प्रणालीत मात्र सगळा भर पहिल्याच पद्धतीवर आहे. शाळेत समजले नाही तर आपण आपल्या मुलांना शिकवणी वर्गात पाठवितो. हे चार भिंतींत दिलेले शिक्षण सुजाण नागरिक बनविण्यासाठी असमर्थ ठरते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी इतर तीन मार्गांचा देखील अवलंब करणे आवश्यक आहे. या दृष्टीने ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ हे शैक्षणिक सहलींचा एक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविते.

१९३५ मध्ये 'विद्या प्रसारक मंडळा'ची स्थापना झाली. मागील ८१ वर्षांत या मंडळाने नेत्रदीपक अशी प्रगती केली आहे. आजमितीस मंडळाच्या एकूण १५ संस्था (विभाग) आहेत. शालेय स्तरापासून पदव्युत्तर शिक्षण देण्याची सुविधा या मंडळाने ठाणे शहरात निर्माण केली आहे. काही वर्षांपूर्वी मंडळाने वेळणेश्वर येथे एक अभियांत्रिकी महाविद्यालय उभारले आहे. या महाविद्यालयाची पहिली तुकडी मागच्या शैक्षणिक वर्षांत अंतिम परीक्षेला बसली. त्यांचा निकाल ९२.८ एवढा चांगला लागला आहे. विद्या प्रसारक मंडळाने चालविलेल्या शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बाहेरच्या जगाची ओळख व्हावी यादृष्टीने मंडळ वेगवेगळ्या शैक्षणिक सहलींचे आयोजन करते. त्याचबरोबर, आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या विविध स्पर्धांना आपले विद्यार्थी पाठविते. मागील अनेक वर्षांपासून हे कार्य अविरत चालू आहे.

**शैक्षणिक सहल, इंग्लंड**

२००६ पासून विद्या प्रसारक मंडळ विद्यार्थ्यांसाठी इंग्लंड सहलीचे आयोजन करीत असते. या सहलीत

(पृष्ठ क्र २ वर)


(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

ऑक्सफर्ड, केंब्रीज आणि लंडन या तीन शहरात भेटी आयोजित केल्या जातात. या भेटीसाठी काही शैक्षणिक संस्था, वाचनालये आणि वस्तू संग्रहालये यांची निवड केली जाते. या तीनही बाबतीत ही शहरे खूपच समृद्ध आहेत. कोणत्याही ठिकाणी जाण्यापूर्वी प्रथम त्या संस्थेची जुजबी माहिती दिली जाते आणि तेथे गेल्यावर काय पाहावे याबद्दल सूचना दिल्या जातात. संध्याकाळी हॉटेलात परत आल्यावर काय पाहिले याची चर्चा केली जाते. या सगळ्या प्रयत्नांतून विद्यार्थी खूप ज्ञान प्राप्त करतात. आमच्या सहलीत प्रत्येकाने रोजनिशी लिहिलीच पाहिजे असा आमचा आग्रह असतो. रोजनिशी लिहायला सुरुवातीला मुले टाळाटाळ करतात. परंतु लवकरच त्याना रोजनिशी लिहिण्याचे महत्त्व पटते. दररोज संध्याकाळी दोन किंवा तीन विद्यार्थ्यांच्या रोजनिशीचे वाचन केले जाते. इतर विद्यार्थी नंतर कोणत्या बाबी लिहायच्या राहिल्या हे त्या विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देतात. या सूचनांचा अंतर्भाव करून माहितीने समृद्ध अशी रोजनिशी घेऊन मुले परततात.

इंग्लंड सहलीची सुरुवात झाली ती शिक्षकांपासून. लिग फॉर द एक्स्चेंज ऑफ कॉमनवेल्थ टिचर्स (League for the Exchange of Commonwealth Teachers) अशा नावाची एक संस्था लंडनमध्ये आहे. या संस्थेच्या विनंतीवरून इंग्लंड मधील शिक्षकांची भारत भेट विद्या प्रसारक मंडळाने फेब्रुवारी २००४ मध्ये आयोजित केली होती. त्यावेळी भारतातील शालेय शिक्षण कसे चालते याची त्यांना कल्पना येण्यासाठी काही शाळांना भेटी आयोजित करण्यात आल्या. या भेटीत भारतीय आणि ब्रिटिश शिक्षक यांच्यात बरीच चर्चा झाली. शाळाभेटी संपल्यानंतर, ''आम्हाला त्यांची शिक्षण प्रणाली पाहायला मिळेल का?'' अशी विचारणा काही भारतीय शिक्षकांनी केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन ठाणे परिसरातील शिक्षकांची पहिली शैक्षणिक सहल २००४ च्या नोव्हेंबर महिन्यात आयोजित करण्यात आली. लंडन मधील न्यू हॅम शिक्षण विभागाने त्याचे आयोजन केले होते. या विभागात असलेल्या शाळा भेटी बरोबरच त्यानी लंडन शहरातील अनेक प्रेक्षणीय स्थळांना भेटी घडवून आणल्या. या योजनेला एवढा प्रतिसाद मिळाला की केवळ सात महिन्यानंतर म्हणजे जून २००५ मध्ये आम्ही शिक्षकांसाठी दुसरी सहल आयोजित केली. या वेळेस ऑक्सफर्डशायर शिक्षण विभागाने यजमानपद स्वीकारले होते. परिसरातील शाळांबरोबरच त्यानी ऑक्सफर्ड विद्यापीठ आम्हाला दाखविले. ते पाहिल्यावर काही शिक्षकांनी आम्हाला सुचविले की, भारतीय विद्यार्थ्यांना हे विद्यापीठ दाखविले तर खूप उपयुक्त ठरेल. त्यांच्या सूचनेवरून आम्ही पुढच्याच वर्षी म्हणजे २००६ मध्ये केवळ विद्यार्थ्यांसाठी सहल आयोजित केली.

सुरुवातीला शिक्षकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी अशा दोन वेगवेगळ्या सहली आम्ही आयोजित करीत असू. काही वर्षांनंतर आम्ही शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्ही गटांना एकत्र घेऊन जाऊ लागलो. ही व्यवस्था फारच उपयोगी ठरली. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये फलदायी अशी आंतरक्रिया घडून येते असे आमच्या लक्षात आले. त्यानंतर आम्ही पालकांचा देखील सहलीत समावेश करू लागलो. शिक्षक, विद्यार्थी आणि पालक हे तीन गट एकमेकांना पूरक ठरतात असे आमच्या निदर्शनास

(पृष्ठ क्र. ३८ वर)




व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

## वर्ष सतरावे / अंक ८ / ऑगस्ट २०१६



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २१ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | लंडन मधील 'इंडिया हाऊस' | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | व्यक्तिवेध-०५:जलतज्ज्ञ माधव चितळे | श्री. नरेंद्र गोळे | ७ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ३०) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ५) | ओळख वनस्पतींची- खाजकुयरी / कवचबीज | श्री. प्रकाश दुधाळकर | १४ |
| ५) | ऑक्सफर्ड, केंब्रिज शैक्षणिक सहल | श्री. सुभाष एंगडे | १६ |
| ६) | भारतीय इतिहासातील पहिला महान सम्राट- चंद्रगुप्त मौर्य | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १९ |
| ७) | ऑक्सफर्ड - केंब्रिज आणि बरंच काही | अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी | २९ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# लंडन मधील 'इंडिया हाऊस'

*इंग्लंडच्या शैक्षणिक सहलीत सहभागी झालेले सर्व सभासद लंडनमधील 'इंडिया हाऊस' पाहून आले. त्यानिमित्ताने त्या घराची माहिती आणि त्याच्याशी जुळलेला इतिहास लेखकाने विशद केला आहे - संपादक*

१९९८-९९ या कालावधीत मला इंग्लंडच्या मुक्त विद्यापीठात काम करण्याची संधी मिळाली. १९६९ साली स्थापन करण्यात आलेले हे जगातले पहिले मुक्त विद्यापीठ असून ते मिल्टन केन्स या गावात आहे. लंडनच्या उत्तरेला साधारणपणे ८० किलोमीटरवर वसलेले हे एक सुबक शहर आहे. भरपूर झाडे, सरळ रस्ते, जलाशय अशा विविध सुविधांनी युक्त असे हे नियोजनबद्ध शहर आहे. असे जरी असले तरी लंडन शहराचे आकर्षण काही औरच आहे. आपल्याकडे जसे मुंबई शहराचे आहे तसेच तिथे लंडन शहराबाबत आहे. इंग्लंडला येणारी प्रत्येक व्यक्ती एकदातरी जीवाचे लंडन करण्याची इच्छा बाळगून असते. मलाही लंडनला भेट देऊन तेथील महत्त्वाची ठिकाणे पाहण्याची दांडगी इच्छा होती. तसे मी मुक्त विद्यापीठातील माझ्या एका सहकाऱ्याजवळ बोलून दाखवले. माझ्या विनंतीवरून त्यानी मला एका रविवारी लंडन दाखविण्याचे कबूल केले. त्याच्या बरोबर मी वेस्ट मिनिस्टर पॅलेस, बकिंगहॅम पॅलेस, टॉवर ऑफ लंडन, रॉयल ऑब्झरवेटरी इत्यादी ठिकाणी जाऊन आलो. मला वाटले झाले आता लंडन पाहून. परंतु माझे हे समाधान फार काळ टिकले नाही. योगायोगाने मिल्टन केन्स पासून जवळच असलेल्या बेडफर्ड या गावी राहणारे वासुदेव गोडबोले यांची काही दिवसानंतर भेट झाली. पहिल्या भेटीतच त्यानी मला, 'लंडन पाहिले का?' असे विचारले. मी त्यांच्या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले आणि जी जी ठिकाणे पाहिली त्याची यादीच त्यांना सांगितली. ती यादी ऐकून त्यांच्यावर फारसा प्रभाव पडला नाही. त्यानी मला विचारले, 'लंडनमधले इंडिया हाऊस पाहिले काय?' ते अर्थातच मी पाहिले नव्हते. मुळातच लंडन मध्ये 'इंडिया हाऊस' ही गोष्टच मला नवलाची वाटली. इंडिया हाऊस काय आहे? असे मीच त्यांना विचारले. त्यावर त्यांनी मला फारच उपयुक्त माहिती दिली. ती माहिती वाचकांसाठी खाली देत आहे.

ही गोष्ट आहे विसाव्या शतकाच्या सुरुवातीची. शामजी कृष्ण वर्मा हे जुनागढ संस्थानाचे प्रधान होते. जुनागढ त्यावेळेस इंग्रजी अमलाखाली होते. त्यामुळे इंग्रज अधिकाऱ्यांची मर्जी सांभाळणे त्यांना आवश्यक होते. परंतु शामजी ठरले देशप्रेमी. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी धडपड करणाऱ्या क्रांतिकारकाविषयी त्यांना सहानुभूती होती. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे ते क्रांतिकारकांना मदत करीत असत. ते अर्थातच इंग्रज अधिकाऱ्यांना आवडले नाही. त्यानी जुनागढ संस्थानिकाकडे शामजी विरूद्ध तक्रार केली. त्याना खूष करण्यासाठी संस्थानिकांनी शामजींना पदच्युत केले. शामजींचे शिक्षण ऑक्सफर्डच्या ऑल कॉलेजमध्ये झाले होते. त्यामुळे त्यांना इंग्लंडची चांगली माहिती होती. जुनागढ मध्ये समस्या निर्माण झाली तेव्हा शामजी लंडनला जाऊन राहिले. त्यांच्याकडे असलेल्या पैशांतून त्यानी १९०५ साली लंडनमध्ये एक घर विकत घेतले. त्या घराचे नाव त्यानी इंडिया हाऊस असे ठेवले. इंडिया हाऊसचा उपयोग ते विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वसतिगृहासारखा करू लागले. त्या काळात भारतातून अनेक जण उच्च शिक्षणासाठी लंडनला जात असत. त्यांच्या राहण्याची व खाण्यापिण्याची गैरसोय होत असे. ती दूर करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

---

उषःकाल कितीही चांगला असला तरी सूर्याला सुद्धा तिथे फार काळ थांबता येत नसतं!

त्याचबरोबर स्वातंत्र्याची ज्योत त्यांच्या मनात जागविणे हा देखील एक उद्देश होता. या घरात त्यांनी अल्प शुल्कात राहण्याची सोय उपलब्ध करून दिली. या योजनेचा फायदा अनेक भारतीय विद्यार्थ्यांनी घेतला. त्यामधे समावेश होता स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा. १९०६ ते १९०९ या कालावधीत सावरकर येथे राहिले होते. आपल्या अभ्यासाबरोबरच इतर बरीच कामे त्यांनी येथे राहून केली. त्यामुळे या घराला विशेष महत्त्व आहे.

श्री. गोडबोले हे इंडिया हाऊसची माहिती देत होते आणि मी ती मनापासून ऐकत होतो. क्षणोक्षणी माझे कुतूहल चाळवले जात होते. त्यांची माहिती सांगून होईपर्यंत आपण इंडिया हाऊस पाहिलाच पाहिजे असा निर्धार मी मनाशी केला. त्या घराचा पत्ता मी त्यांच्याकडून घेतला. मला लंडनची फारशी माहिती नसल्याने तेथे कसे पोहोचावे यासंबंधी अनेक प्रश्न मी त्याना विचारू लागलो. माझी अडचण ओळखून ते म्हणाले, ''चला, मीच तुम्हाला घेऊन जातो.'' पडत्या फळाची आज्ञा मानून त्यांची सूचना मी ताबडतोब मान्य केली. लंडन दर्शनासाठी एक रविवार आम्ही ठरविला. त्या दिवशी दिवसभर त्यानी मला इंडिया हाऊस बरोबरच अनेक महत्त्वाची स्थळेही दाखविली. ती भेट माझ्या अजूनही स्मरणात आहे.



विद्या प्रसारक मंडळ ठाणे यांच्या वतीने २००४ पासून आम्ही इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करू लागलो. या सहलीचा एक भाग म्हणून आम्ही इंडिया हाऊसला आवर्जून भेट देतो. '६५ कॉमवेल एवेन्यू' असा या घराचा पत्ता आहे. तेथे जाऊन आम्ही सावरकरांच्या कामाची माहिती देतो. सावरकरांनी देशासाठी मोठे बलिदान दिलेले आहे त्याची माहिती नवीन पिढीला होणे महत्त्वाचे आहे.



**इंडिया हाऊसची सुबक इमारत**

इंडिया हाऊसचे वैशिष्ट्य असे की, त्यावर सावरकरांच्या नावाची पाटी आहे. ही पाटी लंडन काऊंटी कौन्सिलने १९८३ साली लावली. १९८३ हे सावरकरांचे जन्म शताब्दी वर्ष होते. त्याचे औचित्य साधून ही पाटी लावण्यात आली. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी अशी पाटी लावण्याची इंग्लंड मध्ये प्रथाच आहे. पाटी म्हणजे खरा तर दगडच असतो. त्याला निळा रंग लावलेला असतो. म्हणून त्याला 'नील फलक' (Blue plaque) असे म्हणतात. या फलकावर त्या स्थानाबद्दल किंवा व्यक्तीबद्दल थोडक्यात माहिती दिलेली असते. इंडिया हाऊसवर जो फलक आहे त्यावर असे लिहिले आहे की, 'विनायक दामोदर सावरकर, भारतीय देशभक्त आणि विचारवंत येथे राहात असत. १८८३-१९६६.' इंग्रजीत फलकावर लिहिलेला मजकूर असा आहे : Vinayak Damodar Savarkaran Indian Patriot and Philosopher lived here (1883-1966). इंग्रजांनी सावरकरांना सतत आपला शत्रू मानले. त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा दिली. असे जरी असले तरी त्यांच्या निवासस्थानी फलक लावायला ते विसरले नाहीत!

आयुष्यात इतकं पण भावनिक होऊ नका की स्वतःला दुखवाल!
पण आयुष्यात इतकं पण कठोर होऊ नका की दुसऱ्यांना दुखवाल!




**इंडिया हाऊसवर असलेला 'नील फलक'**

मे २०१६ मध्ये विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या वतीने शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत विद्यार्थी, शिक्षक आणि पालक असे सगळे मिळून २४ जण होते. या सगळ्यांना घेऊन आम्ही इंडिया हाऊसला भेट द्यायला गेलो. खरे तर आम्हाला त्यांच्या जन्मदिवशी म्हणजे २८ मेलाच तिथे जायचे होते. परंतु त्यादिवशी दुसरे काम असल्याने दोन दिवस आधीच आम्ही इंडिया हाऊसला भेट देऊन आलो. आमच्या राहण्याच्या ठिकाणाहून इंडिया हाऊस जरा दूरच होते. त्यासाठी आम्ही प्रथम भुयारी रेल्वेने आर्चवे स्टेशनपर्यंत गेलो. त्यानंतर सिटी बसने क्रॉमवेल एवेन्यू जिथे सुरू होतो तिथपर्यंत गेलो. पुढचा प्रवास आम्ही पायीच केला. हा रस्ता जरा वळणाचा आणि चढ असलेला आहे. दोन्ही बाजूला बहुमजली कौलारू घरे आणि त्यामधून जाणारा अरुंद रस्ता असे ते चित्र होते. हळूहळू पावले टाकत आम्ही इंडिया हाऊस जवळ पोहोचलो. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला उभे राहून ती वास्तू आणि त्यावरील फलक आम्ही सर्वांना दाखविला. त्यानिमित्ताने सावरकरांचे कार्य त्यांनी स्वातंत्र्य प्राप्तीसाठी केलेले प्रयत्न आणि समाज सुधारणेसाठी घेतलेले परिश्रम यांची माहिती दिली.

इंडिया हाऊस आणि त्यावरील फलक पाहून सगळे जण त्या घराजवळ गेले आणि घराच्या आत जाण्याचा प्रयत्न करू लागले. आम्हाला मात्र त्याना थांबवावे लागले. याचे कारण ही इमारत सध्या खाजगी मालकीची आहे. शामजीनी १९०५ मध्ये ही इमारत घेतली. वसतीगृह चांगल्या तऱ्हेने चालले होते. अनेक भारतीय विद्यार्थी या सुविधेचा फायदा घेऊ लागले होते. परंतु १९०७ मध्ये एकंदर परिस्थिती बदलल्यामुळे त्याना लंडन सोडून पॅरिसला जावे लागले. पॅरिसला देखील त्यांना राहणे कठीण झाले. म्हणून ते जिनिवाला गेले. तिथेच १९३० साली त्यांच्या मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात या वास्तूची देखभाल करणारे कोणी राहिले नाही. त्याहीपेक्षा महत्त्वाची घटना १९०९ च्या जुलै महिन्यात घडली. याच वसतिगृहात राहणारे मदनलाल धिंग्रा यानी सर कर्झन वायली यांचा गोळ्या झाडून खून केला. त्यामुळे इंडिया हाऊस स्कॉटलंड यार्डच्या नजरेत आले. येथे चालणाऱ्या घडामोडींवर आधीच त्यांचे लक्ष होते. वायली यांच्या खुनानंतर या घराची आणि तेथे राहणाऱ्या लोकांची झाडाझडती सुरू झाली. इंग्रज अधिकाऱ्यांच्या वक्रदृष्टीमुळे हे वसतीगृह चालविणे कठीण झाले. भारतातून येणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मिळणारा प्रतिसाद देखील कमी झाला. त्यामुळे इंडिया हाऊस विकावे लागले. १९१० मध्ये रीतसर विक्री होऊन हे घर एका इंग्रज माणसाच्या ताब्यात गेले. त्यामुळे घरात जाऊन ते आतून बघण्याची इच्छा आम्हाला दाबून ठेवावी लागली. परंतु आम्ही घरासमोर एक ग्रुप फोटो मात्र काढून घेतला.



**इंडिया हाऊससमोर काढलेला ग्रुप फोटो**

इंडिया हाऊस ही वास्तू १०० वर्षापूर्वी घडलेल्या अनेक घटनाची साक्ष आहे. लोकमान्य टिळकांच्या शिफारशीवरून सावरकरांना तीन वर्षांसाठी २००० रुपयांची शिष्यवृत्ती शामजी कृष्ण वर्मा यांनी दिली. त्या शिष्यवृत्तीच्या मदतीने वकिलीचा अभ्यास करण्यासाठी सावरकर सप्टेंबर १९०६ मध्ये लंडनला आले. तेव्हापासून सतत तीन वर्षे त्यांचा मुक्काम याच वास्तूत होता. याच घरात 'अभिनव भारत' ही चळवळ त्यानी सुरू केली. दर महिन्याला ते येथून एक पत्रक काढत असत. '१९५७ चे स्वातंत्र्य समर' हे पुस्तक त्यांनी याच वास्तूत लिहिले. ते जेव्हा प्रकाशित झाले तेंव्हा इंग्रजांनी त्यावर लगेच बंदी घातली गेली. भारतातून शिक्षणासाठी आलेल्या लोकांना एकत्र करून आपापसात चर्चा घडवून आणण्याच्या कामी सावरकर पुढाकार घेत असत. भारताचे स्वातंत्र्य हाच त्यांचा चर्चेचा विषय असे. त्यातून अनेक क्रांतिकारक निर्माण झाले. सेनापती बापट यांनी देशप्रेमाची प्रेरणा येथे झालेल्या चर्चेतूनच घेतली. बरेच भारतीय विद्यार्थी याच घरात राहात असत. त्यावेळी एका आठवड्याचे राहण्या-खाण्याचे शुल्क एक पौंड होते. सावरकर तेथे तीन वर्षे राहिले. त्यांना त्यासाठी १५६ पौंड मोजावे लागले. वर उल्लेख केल्यानुसार त्याना शिष्यवृत्ती मिळाली होती ती २००० रुपयांची. त्यावेळी पौंडाचा विनिमय दर एका पौंडाला १५ रुपये असा होता. त्या दराने २००० रुपयाचे होतात १३३ पौंड. ही रक्कम त्यांच्या राहण्या-खाण्याची गरज भागविण्यासाठी देखील पुरत नसे. याखेरीज इतर खर्चासाठी त्यांना पैशाची गरज पडत असे. ही गरज पूर्ण करण्यासाठी त्यांना लंडनमध्ये लहानसहान कामे करावी लागत असत.

सावरकर राहायचे इंडिया हाऊस मध्ये आणि शिकायला जायचे ग्रेज इन कॉलेज मध्ये. या दोन ठिकाणातील अंतर बरेच आहे. त्याकाळी या दोन ठिकाणांना जोडणारी भुयारी रेल्वे नव्हती. बरेच अंतर त्यांना पायी चालावे लागत असे. त्यापुढे ते भुयारी रेल्वेने कॉलेजमध्ये जात असत. ग्रेज इन कॉलेज लंडनच्या मध्यभागी आहे. तेथे तीन वर्षे त्यांनी शिक्षण घेतले. कायद्याचा अभ्यासक्रम त्यांनी प्रामाणिकपणे पूर्ण केला. सर्व परीक्षा चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण केल्या. तरीही इंग्रज सरकारच्या सूचनेवरून कॉलेजच्या अधिकाऱ्यांनी त्यांना बार अॅट लॉ च्या सभेला बोलावले नाही. त्यामुळे तीन वर्षे काबाडकष्ट करून देखील त्याना पदवी मिळाली नाही. इतरांप्रमाणे त्याना सनद मिळाली नाही. ते वकिली करू शकले नाहीत. एव्हढेच नव्हे तर त्यानी इंग्लंड सोडून जाऊ नये असा इंग्रज सरकारने आदेश काढला. शिष्यवृत्ती संपली आहे, शिक्षण पूर्ण झाले आहे तरीही मायदेशात परत जाता येत नाही अशा विचित्र परिस्थितीत सावरकर सापडले. कसेतरी करून दिवस ढकलणे आवश्यक होते. म्हणून त्यानी लंडनच्या दक्षिणेला असलेल्या ब्रायटन नावाच्या गावी जाऊन राहाणे पसंत केले. तेथे त्यांचे एक भारतीय मित्र राहात असत. त्यांच्याकडे काही महिने ते राहिले. याच काळात एकदा समुद्र किनाऱ्यावर बसले असता आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्यांनी ''ने मजशी ने परत मातृभूमिला, सागरा प्राण तळमळला'' ही अजरामर कविता रचली. ही कविता म्हणजे सावरकरांच्या सृजनशीलतेचा एक उत्तम नमुना आहे.

इंडिया हाऊसला दिलेल्या भेटीने इतिहासातील अनेक घटनांची उजळणी झाली. शामजी कृष्ण वर्मा, सावरकर, मदनलाल धिंग्रा इत्यादी महापुरुषांच्या कार्याची माहिती मिळाली. अत्यंत समाधानाने आम्ही तेथून परत निघालो. क्रॉमवेल एवेन्यूवर आणखी थोडे पुढे चालत जाऊन मुख्य रस्त्यावर आलो. सावरकर यांच्याबद्दल बरेच सांगून झाले. इंडिया हाऊस ही मुळात शामजी कृष्ण वर्मा यांची कल्पना होती. या घरापासून जवळच त्यांचे निवासस्थान होते. ते दाखविल्याशिवाय इंडिया हाऊसची ही सहल पूर्ण झाली नसती. म्हणून आम्ही बसची वाट पाहू लागलो. लवकरच हायगेटकडे जाणारी बस आली. त्या बसने आम्ही साधारणपणे एक दीड

(पृष्ठ क्र. ३७ वर)

# व्यक्तिवेध-०५: जलतज्ज्ञ माधव चितळे

*जल हेच जीवन मानून जलसंपदेचा योग्य वापर करण्याचा कानमंत्र देणाऱ्या डॉ. माधव चितळे यांचा अल्प परिचय या लेखात आहे - संपादक*

डॉ. माधव आत्माराम चितळे यांनी भारताच्या निर्णयकर्त्या आणि व्यूहरचनात्मक नियोजनकर्त्यांना जलस्त्रोतांची जाण देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जलस्रोतांची गुणवत्ता आणि उपलब्धता जपण्याची आवश्यकता नियोजनकर्त्यांना विषद केली आहे. जनजागृती केली आहे. १९८० मध्ये त्यांनी, दरसाल राष्ट्रीय-जलसंसाधन-दिन साजरा करण्याची सुरुवात करून दिली. दरवर्षी एक निराळी संकल्पना निवडली. अशा स्वरुपाच्या जलविषयक-माहिती-प्रसार-मोहिमांतून दक्षिण आशियातील शेजारील राष्ट्रेही प्रभावित झालेली आहेत.

चितळे यांचा जन्म १९३४ मध्ये झाला. १९५५ साली ते स्थापत्य अभियांत्रिकी परीक्षा विशेष पात्रतेसह उत्तीर्ण झाले. मग १९५६ मध्ये ते महाराष्ट्र राज्य अभियांत्रिकी सेवेत (प्रथम वर्ग) रुजू झाले. त्यांनी निरनिराळ्या नदीखोरे प्रकल्पांत, नियोजन, तपास आणि उभारणी संबधित निरनिराळी पदे भूषवली. १९८१ ते १९८३ ते महाराष्ट्र शासनाचे सचिव राहिले. १९८४ मध्ये ते केंद्रिय नदीखोरे आयोगाचे अध्यक्ष झाले. १९८५ मध्ये ते केंद्रिय जल आयोगाचे अध्यक्ष आणि म्हणूनच भारत सरकारचे पदसिद्ध सचिव नियुक्त केले गेले. १९८९ मध्ये जलसंसाधन मंत्रालयात सचिव झाले. ऑगस्ट १९९२ मध्ये ते सेवानिवृत्त झाले.

त्यामुळे चितळे हे १९६० पासूनच जल-तपस्येत व्यग्र होते. देशाच्या निरनिराळ्या भागांतील कार्यक्षेत्रातील प्रकल्पांकरता त्यांची नियुक्ती होई. वरिष्ठ अधिकारी मोठ्या शहरात राहातात आणि प्रकल्पस्थळी काम सुरू राहाते. अशीच खरे तर प्रथा. मात्र ह्या प्रथेस छेद देऊन चितळे स्वतः प्रकल्पस्थळी राहाण्यास जात असत. मग ते १९६१ मधील पानशेत-परिस्थितीचे-पुनर्वसन असो, कोयना-भूकंपग्रस्त-प्रकल्पाचे पुनर्नियोजन असो किंवा भातसा-प्रकल्पाचे कार्यान्वयन असो. जलसंसाधन खात्याची प्रकल्प-कार्यालये मोठ्या शहरांतून हलवून, थेट प्रकल्पस्थळीच नेण्याची त्यांची संकल्पना अत्यंत उपयुक्त ठरली.

१९६१ मधील पानशेत-खडकवासला धरणफुटीपश्चात पुणेवासियांच्या तोंडचे पाणी पळाले होते. परंतु पावसाळा अजून सुरूच असल्याने नद्यांना विपुल पाणी होते. म्हणून शहरवासियांना त्यांच्या पावसाळ्यापश्चातच्या भीषण भवितव्याची जाण नव्हती. उर्वरित वर्षभर पुण्याला पाणी पुरवायचे कसे, ह्याचे उत्तर पावसाळा संपण्याच्या आत शोधून, ताबडतोब उपाय करून, हा यक्षप्रश्न चितळेंनी उद्‌भवूच दिला नाही. त्यांनी अत्यंत ऊर्जस्वलपणे पाणीपुरवठ्याची साधने पुनर्स्थापित करण्याकरताचे प्रयत्न अल्पावधीतच हाती घेतले आणि 'वेळेत' यशस्वी करून लक्षणीय कीर्ती मिळवली.

१९६० मध्ये मुंबई शहरास ६० किलोमीटर अंतरावरून बंद-जल-वाहिन्यांद्वारे पिण्याचे पाणी पुरवण्याची योजना वर्ल्ड बँकेच्या विद्यमाने बनवली गेली. चितळेंनी ह्या योजनेत सिंचन-कालवे, जल-विद्युत-प्रकल्प आणि नदीखालूनच्या बोगद्यांनाही समाविष्ट करवून घेतले. योजना पूर्ण होताच दोन अब्ज लिटर पाणी दरदिवशी मुंबईत खेचले जाऊ लागले.

जलाशय आणि मुंबई शहर यांदरम्यानच्या सुमारे २५० वर्ग किलोमीटर क्षेत्रातील लोक आणि शेते यांना अनुक्रमे पिण्याकरता आणि सिंचनासाठी पाणी मिळू लागले. पाणचक्क्या स्वस्त जलविद्युत पुरवू लागल्या.


भारत सरकारमध्ये अभियंत्रज्ञ ज्या सर्वोच्च पदावर काम करू शकतो, त्या पदावर त्यांची नेमणूक, १९८९ मध्ये करण्यात आली. ते भारत सरकारच्या जलसंसाधन विभागाचे सचिव झाले. १९९० मध्ये राष्ट्रीय जल महामंडळाची निर्मिती झाली. ही संस्था आणि ती अंमलात आणणार असलेले राष्ट्रीय-जल-नियोजनव्यूह (strategy) यांना गती देणाऱ्यात चितळे प्रमुख राहिले.

गंगा-ऍक्शन-प्लॅन म्हणून ओळखल्या गेलेल्या, भव्य, गंगा-जल-शुद्धीकरण-प्रकल्पाचे ते एक संस्थापक आणि संघटक राहिले. ह्या प्रकल्पात पुढे अनेक नद्यांचा समावेश करून एका राष्ट्रव्यापी कार्यक्रमाचा विकास करण्यात आला. जानेवारी १९९३ मध्ये चितळे यांची नियुक्ती आंतरराष्ट्रीय सिंचन आणि जलनिस्सारण आयोगाचे सरकार्यवाह म्हणून केली गेली (१). ही भारतात मुख्यालय असलेली आंतरराष्ट्रीय संघटना आहे. सिंचन आणि जलनिस्सारण प्रणालींचा प्रभावीपणा सुधारणे आणि पूरपरिस्थितींचा यथोचित सामना करणे हेच तिचे उद्दिष्ट आहे.

डॉ. चितळेंना त्यांच्या प्रयासांखातर निरनिराळ्या पुरस्कारांनी गौरवले गेले आहे. त्यांच्या प्रयासांमुळे भारतात सशक्त जलसंसाधन धोरणे सुरू झाली. जलप्रदूषण नियंत्रण आणि जल-गुणवत्ता-व्यवस्थापन यांचा त्यांत समावेश होता. १९९३ मध्ये जागतिक जलसंधारणातील त्यांचे हे योगदान विचारात घेऊन त्यांना स्टॉकहोम-जल-पुरस्कार जाहीर झाला (२).

जागतिक पाणी परिषदेच्या विकासात आणि जागतिक-जल-सहभागात ते सामिल होते. दक्षिण-आशियातील स्थानिक राष्ट्रीय-जल-सहभागास त्यांनी चालना (promoted) दिली. महाराष्ट्र राज्य जल आणि सिंचन आयोगाने त्यांच्या अध्यक्षतेखाली, जलविकासाच्या तीस वर्षांची पार्श्वभूमी प्रकाशित केली. जलव्यवस्थापनातील स्वयंसेवी संघटनांच्या वाढीसाठी ते आज कार्यरत आहेत. जल ही एक अनमोल संपदा आहे. या जलसंपदेचं नियोजन करण्यासाठी अभ्यास,






स्वतःच्या वाट्याला जरी काटे आले असले, तरी दुसऱ्याला गुलाबाची सुंदर फुले देता येतात.

संशोधन आणि योग्य कृतींची आवश्यकता आहे. भारतातील 'पाणी' या महत्त्वाच्या प्रश्नावर कार्य करणारा हा शास्त्रज्ञ आहे. विज्ञानयात्री- डॉ. माधव चितळे हे पुस्तक डॉ. माधव चितळे यांच्या जल व्यवस्थापनेमधील अभूतपूर्व कार्याविषयी माहिती देते (३).

चितळ्यांनी 'जलसंपदा अभियांत्रिकी' या क्षेत्रात विशेष कामगिरी केलेली आहे. सध्याचा गाजत असणारा मोठी धरणे बांधण्याबाबतचा प्रश्नही सोडवण्यात डॉ. माधव चितळे यांचे योगदान आहे. त्यांचे बहुतांशी कार्य महाराष्ट्राच्या जलसमस्यांविषयक होते. तरीही त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर जल-विषयक-जागृतीचे कार्य हिरिरीने केले. या कार्याबद्दल त्यांना नोबेल पुरस्काराच्या समकक्ष असणारा 'स्टॉकहोम जल पुरस्कार' ही मिळालेला आहे. त्यांच्या पत्नी सौ.विजया ह्यांनी, त्यांच्या लग्नास ५० वर्षे पूर्ण करत असतांना म्हणजेच ३१ डिसेंबर २००९ च्या प्रसंगाचे निमित्ताने प्रकाशित केलेल्या सुवर्णकिरणे ह्या त्यांच्या आत्मचरित्रात, ह्या सर्व गोष्टींचा हृद्य आणि चित्तवेधक सारांश वाचायला मिळू शकेल (४).

भूतलावर आज ७ अब्ज लोक राहातात. २०५० पर्यंत त्यांत आणखी २ अब्ज लोकांची भर पडणार आहे. सांख्यिकीशास्त्र सांगते की, आपल्यापैकी प्रत्येक जण दिवसाला २ ते ४ लीटर पाणी पितो. मात्र आपण पितो ते बव्हंशी पाणी आपल्या अन्नात असते. उदाहरणार्थ १ किलो मांस तयार होण्यास १५,००० लीटर पाणी लागते, तर १ किलो गव्हाच्या निर्मितीकरता १,५०० लीटर (५).

जगातील अब्जावधी लोक आजच बद्धमूल उपासमारीत जगत आहेत आणि पाण्याच्या स्रोतांवर त्याचे दडपण आहे. ही समस्या इतरत्र असल्याचे सोंग आपण घेऊ शकत नाही. समस्या आपल्या आसपासच आहे. लोकसंख्यावाढीची समस्या सोडवणे आणि आपल्या प्रत्येकाकरता अन्नसुरक्षा निर्माण करण्यासाठी आपल्या सगळ्यांनाच हाती घ्यावा लागणार आहे असा एक कार्यक्रम जागतिक पाणी संघटनेने (यू.एन.वॉटर-युनायटेड नेशन्स वॉटर ऑर्गनायझेशन) घोषित केलेला आहे. तो असाः

१. आरोग्यपूर्ण, सातत्याने घेता येईल असा आहार अंगिकारणे.
२. कमी-पाणी-खर्चिक-उत्पादनेच वापरणे.
३. अन्नाचा नाहक अपव्यय टाळणेः जगातील ३०% अन्नपदार्थ कधीच खाल्ले जात नाहीत, त्यामुळे त्यांच्या निर्मितीकरता वापरलेले पाणी निश्चित स्वरूपाने व्यर्थ जाते.
४. उत्कृष्ट गुणवत्तेचे, अधिक अन्न, कमी पाणी वापरून निर्माण करणे.
५. पाणीपुरवठा साखळीतील संचय, वाहतूक, वितरण व वापर ह्या सर्व कृतींत पाणी वाचवणे.

ह्या सर्व उपायांनी आपण साऱ्यांनीच जर पाणी वाचवण्याचा निश्चय केला तर, चितळे ह्यांच्या कामाप्रती आपण यथोचित कृतज्ञता व्यक्त केली असे म्हणता येऊ शकेल.

निरनिराळ्या प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय राजकीय नेत्यांना स्वीकारार्ह वाटेल असे, अजातशत्रू, तांत्रिक नेतृत्व देऊन चितळेंनी भारतातील जल-संसाधन-धोरणास वांछनीय स्वरूप प्राप्त करून दिलेले आहे. मुंबईत २६-०७-२००५ रोजी एकाच दिवशी एक मीटरहून अधिक पाऊस पडून झालेल्या ढगफुटीच्या साद्यंत चौकशी-आयोगाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या निर्णयास संबंधित सगळेच पक्ष स्वीकारतील म्हणूनच त्यांची नियुक्ती झालेली होती. त्यांच्या नैसर्गिक न्यायबुद्धीवर आणि तांत्रिक ज्ञानावर सगळ्यांचाच अपार विश्वास होता. कोलंबोत झालेल्या दक्षिण-आशियाई-

---

परिस्थिती बदलली की माणसं बदलतात. आपली कोण? परकं कोण? सीमा स्पष्ट होतात. पण परिस्थिती बदलूनही जी माणसं बदलत नाहीत तीच माणसं फक्त मनापासून आपली असतात.

जल-सहभाग-परिषदेत तर, पाकीस्तानच्या समितीने, चितळे अध्यक्ष होत असतील तर आम्हाला चालतील अशी भूमिका घेतली होती.




महाराष्ट्राच्या, भारताच्या जलनीतीचा अभ्यास करताना माधवराव चितळे हे नाव टाळून पुढे जाता येत नाही. नेपाळ, भूतान, बांगलादेश व पाकिस्तान या शेजारील राष्ट्रांबरोबर शांततापूर्ण मार्गाने केलेला पाणीवाटपाचा करार असो, भारताची पहिली राष्ट्रीय जलनीती साकारणं असो किंवा राष्ट्रीय जलदिन साजरा करण्याची कल्पना राबवणं असो, प्रत्येक टप्प्यावर माधवराव चितळे हे नाव, पाण्याशी जोडलेलं आहे. या कार्याचा गौरव म्हणून नुकतंच त्यांना 'महाराष्ट्र टाइम्स' तर्फे 'महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरवण्यात आलं. (६) पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांचे हस्ते देऊन, शुक्रवार दिनांक १८-०३-२०१६ रोजी त्यांचा सन्मान करण्यात आला (७). त्यांना माझा मानाचा मुजरा (८). अशाच, निष्ठेने विधिलिखित कर्तव्ये पार पाडणाऱ्याच लोकांच्या, सशक्त आधारावर भारतीय समाजव्यवस्था टिकून आहे. त्यांच्या उन्नत वारशाचा आपणा साऱ्यांस अभिमान असायला हवा!

**संदर्भवाचन:**


१. स्टॉकहोम इंटरनॅशनल वॉटर इन्स्टिट्यूट या संस्थेचे संकेतस्थळ
http://www.siwi.org/sa/node.asp?node=70

२. इंटरनॅशनल कमिशन ऑन इर्रिगेशन अँड ड्रेनेज या संस्थेचे संकेतस्थळ
http://www.icid.org/pastšsg.htmlchitale

३. विज्ञानयात्री - डॉ. माधव चितळे-अ.पां.देशपांडे, राजहंस प्रकाशन, पुष्ठेः१२०, किंमत: रु.१००/- फक्त

४. सुवर्ण किरणे, सौ. विजया माधव चितळे, साकेत प्रकाशन, पृष्ठेः २९६, प्रथम आवृत्तीः २०१०, रु.२७५/-

५. यू.एन.वॉटर, ही युनायटेड नेशन्स ऑर्गनायझेशनच्या २८ निरनिराळ्या संघटनांच्या प्रतिनिधींनी बनलेली संघटना आहे. संकेत स्थळ:
http://www.unwater.org/worldwaterday/

६. जलनीतीचा उपासक-प्रदीप पुरंदरे, सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक, वाल्मी-औरंगाबाद आणि माजी तज्ज्ञ-सदस्य, मराठवाडा विकास मंडळ
http://maharashtratimes.indiatimes.com/edit/samwad/madhavchitale/articleshow/51470398.cms

७. मटा सन्मान: डॉ. माधवराव चितळे 'महाराष्ट्र भूषण'
http://maharashtratimes.indiatimes.com/maharashtra/mumbai-news/mata-sanman-dr-madhavrao-chitale/articleshow/51465373.cms

८. जलतज्ज्ञ माधव आत्माराम चितळे http://nvgole.blogspot.in/2012/03/blog-postš22.htmllinks



**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ३०**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**रविवार १० फेब्रुवारी २०१३ दिवस ७७ वा. केरुपानी - डोंगरगांव - रोहिणी (१५ किमी.)**

सकाळी उठतो तेव्हा प्रायः दिवे नसतात. त्यामुळे आवरायला वेळ लागतो. आज मैय्यावर आनंदाने स्नान केले. आज आवस त्यामुळे आजच्या स्नानास म्हणे महत्त्व असते. या तिरापासून दुसऱ्या तिरापर्यंत पाणी गुडघाभरच असावे. (आजची अमावस्या - मौनी अमावस्या)

रात्रीची खिचडी शिल्लक होती, न्याहारीला उपयोगी पडली. आता बराच वेळ भूक सतावणार नाही. मियाजी होते त्यांना निघायला उशिर व्हायला लागला. कारण आमचे स्नान, पूजा, न्याहारी इ. ते मात्र उठून कधीच तयार झाले होते. त्यांना निघण्याची अनुमती दिली आणि नंतर पाऊण-एक तासाने आम्ही ८।।। ला निघालो.

मैय्या किनारा, गव्हाची शेते, हरभऱ्याची शेते, चढ उतार, टेकड्या आणि त्यामधून जाणरी पायवाट असा प्रवास कित्येक दिवसांपासून सुरु आहे. मैय्याच्या वाळवंटात सध्या सुंदर दगड विखुरलेले आहेत. माझे लक्ष त्यावर असते. कारण मला नैसर्गिक बाण हवे आहेत.

नदीकाठी, जवळच्या टेकड्यांवर मोठेमोठे खडक, पसरले आहेत. हे सगळे प्रकार म्हणजे फॅसिल्स आहेत. मोठमोठ्या आडव्या उभ्या खोल रेषा आहेत. एका खडकावर पानाचा ठसाही मी पाहिला. खडकाचा तुकडा लहान असता तर बरोबर ठेवले असता.

आज चालताना मित्राजी बरोबर नाहीत, बरे वाटले. त्यांच्या उपदेशपर काही गोष्टी त्यांच्या दृष्टीने ठीक असल्या तरी मला स्वीकारार्ह वाटल्या नव्हत्या उदा. मंत्रोच्यारण मनात करावे, मोबाईलवर फार बोलू नये इत्यादी.

तुहिन मित्रा यांनी मला योग्यवेळी धीर देऊन परिक्रमा सोडण्यापासून वाचविणे हे खरे असले तरी मनाची/विचारांची तार जुळावी असे काही नव्हते. मी त्यांच्यासाठी बुटांचा खर्च का केला, माहीत नाही. मला वाटले होते की ते कृतज्ञता व्यक्त करतील; पण तसे घडले नाही . त्यांचे पहिले बूट सुद्धा कोणी महंताने त्यांच्यासाठी आणले होते. मी बूट घेतले, ५ मोजे जोड घेतले, मित्रांना वरती पाचशे रुपये दिले. बन्सीला एक हजार रुपये दिले होते. पण त्याने फक्त पाचशेची नोट उचलली व आवश्यक खरेदी झाल्यावर ठरलेले पैसे परत देत होता पण ते मी घेतले नाहीत. परंतु आज मात्र तो म्हणाला की, कोणत्याही परिस्थितीत तो पैसे परत केल्याशिवास राहणार नाही. माझी मात्र त्याच्याकडून किंवा मित्रांकडूनही परत फेडीची अपेक्षा नाही.

सकाळी साडे-अकरा वाजता मैय्याकिनारी एक महिला आणि तिची मुलगी कणकेचे मोठे गोळे मळताना पाहिलेली. आम्हाला भोजन प्रसादाची विनंती केली, जी आम्ही मान्य केली नाही. ते कुटुंब परिक्रमावासी नव्हते मग नदीकिनारी भोजन का तयार करीत होते?

आजची होती अमावास्या. तीही मौनी. दर अमावास्या पौर्णिमेला मैय्या स्नान आणि त्यानंतर भोजन प्रसाद आणि तोही त्या वाटेने येणाऱ्या प्रत्येक परिक्रमावासीसाठी!

आम्ही १२।।। वाजता पुढल्या गावात- जोतखेडा- गावात पोहोचले. पहिल्या घरासमोर भोजनाची चौकशी केली तर म्हणाले की सदावर्त मिळते ते घेऊन भोजन तयार करून जेवावे लागेल. अर्थात एका व्यक्तीचे मत हे काही पूर्ण गावाचे मत होऊ शकत नाही. पुढे जाऊन एका घरात बाहेरूनच विचारले मैय्या, क्या हमे रेवि मिस सकती है? तुरन्त जबाब मिला! आइये बाबाजी, भोजन बनाके खिलाते है ।

सतत कामात राहिल्याने माणसाचे जीवन सुखी बनते.

दहा मिनिटात ओट्यावर आम्ही जेवायला बसलो होतो. वरण भात, पुरी, भाजी, दूध, पापड, लोणचे इतके साग्रसंगीत भोजन घरातील महिलांनी आम्हाला दिले. ज्या स्त्रीने भोजनाला 'हो' म्हटले तिने तीन वर्षांपूर्वी परिक्रमा केली आहे. तिचा पती येईतो जेवण संपत आले होते, त्यांनेही मोठ्या प्रेमाने अगत्याने आमची ऊठबस केली.

तासाभरात पुन्हा मार्गस्थ झालो. संध्याकाळी ५ वाजता रोहिणी या अगदी छोट्या खेड्यात, डोंगराच्या कुशीत, एका छोट्या टेकडीवर वसलेल्या गावात मुक्काम केला. गावच्या तिफाटण्यावर एक छपरी आहे, तीन बाजूंनी पूर्ण उघडी, छपरीत बजरंग बवी व नर्मदा मैय्याच्या छोट्या घुमट्या आणि जोडीला आता मुक्कामी आम्ही दोघे!



कोणी प्रतिसाद देत नाही हा राग थोड्या वेळाने निवळला. गावकरी २/४ जमले, चहापाणी मिळाले, सत्संग झाला. आम्ही भोजन मागितले नव्हते, अपेक्षिले नव्हते, तरी ५/६ वाट्या व बटाट्याची सुंदर भाजी मंदिरात आली! साडे-दहापर्यंत ते गावकरी आनंदाने बसले होते. दोघे तर उत्तम बासरीवादक आहेत. गावकऱ्यांनी पुरविलेल्या ढणढण्याच्या उजेडात डायरी लिहितोय!

**सोमवार ११ फेब्रुवारी २०१३. दिवस ७८ वा. रोहिणी कुरेषा जुप्रा (हिरण नदी संगम) पावळा मु. गुळाची भट्टी**

काल गावावर असलेला संध्याकाळचा रोष रात्री नाहीसा झाला होता. गोविंद यादव सरोज, सुभद्रा ह्या त्या मुलाच्या बहिणी. खूपच सहकार्य नंतर मिळाले. सकाळी दोन ठिकाणी चहा घेतला, बरोबर रात्री घेतलेला चिवडा इ. खाल्ला. निघायला नऊ वाजून गेले. कारण सकाळी स्नान, कपडे, मैय्यापूजन, चहा, न्याहारी या साऱ्यात वेळ जातो.



रस्ता म्हणजे मैय्याकिनारा. पायात खूप वाळू गोटे असले की रेतीत शंख शिंपले ही अगदी समुद्रकिनाऱ्यावर दादर, गिरगांव, मढ, रामेश्वर अशा ठिकाणी मिळत तसे भरपूर प्रमाणात मिळतात.

गव्हाची शेते आता कमरेइतक्या उंचीच्या रोपांनी भरली आले, लोंब्या भरपूर लागल्या आहेत आणि पायवाट अशी की उजव्या बाजूच्या रोपांना घासत जायला होते. पावले टाकताना काठी उभ्या ऐवजी आडवी धरून जाताना विचार असतो की आपल्यामुळे या रोपांना दुःख पोहोचू नये.

दोन दिवसांपूर्वी शेकलेले घाटे खायला मिळाले होते. शेताच्या मालकाने स्वतः शेकोटी पेटवून त्यात उपटलेले हरभरे टाकतात. रोपे जळून जातात व काळे पडलेले घारे नंतर वेचून खातात.

नर्मदेच्या पाण्यात परवा एक ढोर मेलेले दिसले तर आज एक कुत्रा फुगलेल्या अवस्थेत पाण्यात सडताना दिसला.

हिरणी नदी संगम होडीने पार करावा लागतो. होडी रात्री पाण्यात होती पण मैय्याचे पाणी ओसरून होडी दगडांमध्ये फसली होती. नावाडी एक छोटा मुलगा होता. त्याची हिंमत अशी की एकटाच होडी पाण्यात लोटायचा प्रयत्न करत होता. जवळपास तासभर प्रयत्न बन्सीने केले व एकदाची होडी पाण्यात ढकलली.

इतकावेळ २/३ तास नदीकिनारी चाल आणि ऊन. त्यामुळे चहापाणी भोजन नाहीच पण तापायलाही होत होते. कारण सावली नावालाही नव्हती.

भूतकाळ सतत डोक्यात ठेवला तर आपण आपला वर्तमानकाळ बिघडवत असतो.

दोन दिवसांपूर्वी मात्र थोड्या उंचावरून जाताना बोरांनी लगडलेली काही झाडे लागली. अगदी मैय्याकिनारी!

पावला गाव आल्याचे कळले. कारण घाटावर दिसली जनावरे आणि माणसे. गंमत म्हणजे घाटाजवळ रेती दूर करून खड्डा करून त्यात किनाऱ्याकडील टेकडीकडून आतून झरणारे पाणी गोळा करून त्यात गावकरी आंघोळ करतात. उन्हाळ्यात थंड तर हिवाळ्यात गरम म्हणजे मैय्याचे पाणी गरम तर हे पाणी थंड व मैय्याचे पाणी थंड तर हे झरणारे पाणी गरम/ कोमट असते. असे काही ठिकाणीच पाणी गोळा करता येते असे कळले. झरणारे पाणी स्वच्छ नितळ आणि दहा मिनिटात तो ८''/१०'' चा खडा भरून पाणी वाहू लागले. वाळूचा बांध घालतात त्या वाळूत छान रंगीत दगड गोटे दिसले.

पलीकडच्या किनारी पाण्याजवळ अनेक बगळे हारीने बसले होते. दोन मच्छिमार गळाभर पाण्यात शिगेचा भाला घेऊन गेले व खाली बुडी मारून पायांतील खडकांमध्ये शिगा खुपसून मासे मारत होते. असे दृश्य मी प्रथमच पाहिले. ४/५ किलोचे मासेही मिळतात!

पावला गावात वर चढलो, चढण इतकी की दोनदा थांबून दम खाल्ला पहिल्याच दुकानदाराचे चहा दिला. बिस्किटे विकत घेतली, चार कॅडबरी छोटी चॉकलेटस् घेतली तर आणखी चार चॉकलेटस् दुकानदाराने दिली. पण पैसे फक्त बिस्किटाचे घेतले. २।। वाजून गेले होते. भूक तर लागली होती. परंतु या अवेळी विचारणार तरी कसे?

गावातून बाहेर पडताना एका झाडाला छान बोरे दिसली म्हणून काठीचे काही बोरे पाडून गोळा केली ५ किंवा ६. नंतर पाहिले की झाड रस्त्यावरचे नसून घराच्या कुंपणात होते. घर मालकांची बाहेरून क्षमा मागितली व सांगितले की आपल्या बोरीच्या झाडाची बोरे आम्ही आपल्याला न विचारता पाडली. किनाऱ्यावरून आल्यामुळे जेवलो नाही, भूक लागली होती.

इतके कळल्यावर त्या अग्रवाल नावाच्या सदगृहस्थाने आम्हाला बोलावले व पाचव्या मिनिटाला आम्ही अंगणात भोजन करीत होती. यांची वडिलार्जित ३० एकर जमीन होती. कूळकायदा आला, जमीन विकून टाकली, दोन भाऊ आहेत. आता यांच्याकडे शंभर एकर जमीन आहे. आमच्या बरोबर स्वतःही जेवायला अंगणातच पाटावर बसले. माशा फार, नातू पंख्याने माश्या वारित होता तर आम्ही हाताने माशा वारीत जेवत होतो. पाण्याच्या बाटलीवरसुद्धा माश्याच माश्या!

अग्रवाल हे गृहस्थ वयस्कर परंतु देहयष्टि आणि त्याला शोभेल असा कुटुंब प्रमुखाचा दरारायुक्त आवाज, मुलगा कुंभमेळ्यासाठी अलाहाबादला गेला आहे. तिथे झालेल्या चेंगराचेंगरीत शेकडो माणसे मेल्याची बातमी त्याने फोनवर दिली तर सरकारी आकडा २४ आहे!

हवा पावसाळी झाली. उकाडा वाढला. ४ वाजायला आले होते. पुढे ५km/६km जायचे म्हणून निघालो. गुळाची भट्टी दिसली म्हणून रस पिण्यासाठी तिथे गेलो आणि आग्रहामुळे मुक्कामी राहिलो. ५०/६० फुटांची ओसरी तशीच आणखी काटकोनात. इतके मोठे घर परंतु गवत, धान्य इ.ओसरीत अधिक स्टोअररूममध्ये! एक खाट उचलून आमची झोपायची व्यवस्था एका मोठ्या (३ Ton क्षमता) काहिली शेजारी केली गेली.



न याचिता उत्तम भोजन मिळाले. खुमानसिंग पटेल यांचे हे घर. आतिथ्यशील!

**– अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

म्हणून झालेल्या चुका विसरून पुन्हा नव्याने कामाला लागलं पाहिजे.

# ओळख वनस्पतींची
# खाजकुयरी / कवचबीज

*'ओळख वनस्पतींची' या लेखमालेतील नववा भाग. 'खाजकुयरी / कवचबीज' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, अनेक सुंदर गोष्टींची भुरळ पडून आपण त्यांच्या जवळ जातो अन् पदरी पडते निराशा किंवा आपली फसगत झाल्याचे लक्षात येते. निसर्गातही अशा अनेक गोष्टी आहेत ज्या दिसावयास सुंदर असतात, मोहक असतात मात्र प्रत्यक्ष हाताळताना किंवा अगदी जवळ गेल्यानंतर त्याचे खरे रूप किंवा गुण लक्षात येतात. सध्याचे दिवस भटकंतीचे आहेत. निसर्गात सुंदर हिरवाई दाटली आहे. झाडे ताजीतवानी होऊन वाऱ्याच्या झुळूकी सोबत छान डोलत उभी आहे. विविध वेली झुडपे भराभर वाढाला सुरुवात झाली आहे. नवीन अंकुर तरारून वर येत जास्तीत जास्त अवकाश व्यापण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही झुडूपांवर, वेलींवर सुंदर फुले देखील फुलली आहेत. या फुलांच्या सौंदर्याने भारावून ती तोडण्याचा व आपल्या प्रिय व्यक्तिंना भेट म्हणून देण्याचा किंवा मैत्रिणीच्या केसात माळण्याचा मोह नक्कीच होतो. पण थांबा ऽऽ निसर्गातील कोणतीही पाने किंवा फुले त्यांची माहिती असल्याशिवाय हाताळू नका. जंगलात फिरतांना तेथील पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही याची काळजी घेणे जसे गरजेचे आहे, तसेच आपले स्वतःचेही नुकसान होणार नाही किंवा दिवसभर मनस्ताप होणार नाही याचीही दक्षता घेणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

घेवड्याच्या किंवा बालाच्या पानांसाठी सुंदर पोपटी तीन पर्णिका असणारी पानांची वेल, छान लयदार नागमोडी वळलेले त्यांचे शेंडे, वेलीवर आलेली खाली लोंबकळणारी घेवड्याच्याच फुलांसारखी पण जांभळ्या रंगाची कुयरीच्या आकाराची सुंदर फुले पाहून आपला हात अलगद पुढे जातो व त्या सुंदर फुलांचा तुरा तोडण्याचा प्रयत्न करतो किंवा तोडतो देखील अन् फुलांसोबत असंख्य बारीक सूक्ष्म काट्यांनी आपल्या हातावर किंवा बोटांवर गर्दी केलेली असते. हातावर लालसर पुरळ उठून असह्य खाजेने आपण हैराण होतो. हा हात दुसरीकडे कुठे लावला तर तेथेही खाज उत्पन्न होते. हिच गत या वेलीवर लागलेल्या सुंदर सोनेरी तपकिरी रंगाच्या लवयुक्त शेंगा तोडतांना होते. फुलांपेक्षा ही या शेंगा आलीम असतात. शेंगा वाळल्या की गर्द तपकीरी रंगामुळे इतर झुडुपांमध्ये बेमालुमपणे मिसळून जातात. अनवधानाने आपला त्यांच्याशी संपर्क आलाच तर आपली चांगलीच फजिती होऊन पिकनिकचा सारा मुड बिघडून जातो. सध्यातरी या शेंगा आलेल्या नाहीत. मात्र फुलांचे घोस कदाचित पाहावयास मिळतील अशा या जालीम वनस्पतीचे नाव आहे 'खाजकुयरी.'

कुयरीच्या आकाराच्या फुलांमुळे व खाज उत्पन्न करण्याच्या गुणामुळे हे नाव दिले गेले असावे. इंग्रजीत यांना 'वेलवेट बीन' असे नाव आहे. त्याचप्रमाणे यांना Devil beans किंवा Mad beans असेही म्हणतात. खाजवून खाजवून माणूस वेडा होतो. म्हणून हे नाव असावे. याचे शास्त्रीय नाव Mucuna Pruriens असे आहे. ही वनस्पती उष्णकटीबंधीय प्रदेशातील सर्वच देशात आढळत असली तरी तीचे मूळ भारतीय आहे. भारतीयांना फार पूर्वीपासून या वनस्पतीच्या गुणदोषाबाबत माहिती आहे. ही वेल प्रकारातील वनस्पती असून १५

ते २० मीटर उंचीपर्यंत जाऊ शकते. अर्थात वृक्ष किंवा झुडूप यांचा आधार लागतोच. मागील हंगामात लागलेल्या शेंगामधील बीया जमिनीवर पडून पहिल्याच पावसात रुजतात. सुरुवातीला रोपट्यावर लव असली तरी नंतर ती कमी होते. मात्र शेंड्यावर ही तर असतेच. शेंडे कोवळे असेपर्यंत ती तेवढी घातक नसते. या झाडावर ऑगस्ट-सप्टेंबर दरम्यान सुंदर कुयरीच्या आकारात फुले येऊन हिवाळ्यात वेलीवर पोपटी रंगाच्या १० से.मी. लांबीच्या गोल शेंगा दिसू लागतात. या शेंगाचा रंग हळूहळू सोनेरी तपकीरी होत जातो व पक्व झाल्यावर शेंगातून ७ ते ८ लोंबाळक्या गोल वालापेक्षा थोड्या फुगीर बिया बाहेर पडतात. या बिया म्हणजेच आयुर्वेदामधील प्रसिद्ध औषध 'कवचबीज' होय.

या बियांमध्ये अनेक औषधी गुणधर्म असल्याचे आढळून आले आहेत. काही आदिवासी जमातींमध्ये विविध सर्पदंशावर उपचार म्हणून याचा उपयोग करतात. यात काही प्रमाणात तथ्य असल्याचे संशोधनातून निदर्शनास आले आहे. या बियांमध्ये Levodopa हे औषध मोठ्या प्रमाणात मिळते व हे औषध Parkinsous या आजारात वापरतात. मात्र भारतात ते प्रसिद्ध आहे ते पुरुषांच्या वंध्यत्वावर मात करणारे औषध म्हणून. हे मात्र खरे की यात प्रोटीनचे प्रमाण २० ते ३५% असते. हल्ली याचा व्यापारी तत्त्वावर मोठ्या प्रमाणात वापर सुरू आहे. Mucuna Pruriens याच नावाने सप्लीमेंट फूड म्हणून मोठ्या प्रमाणात याची विक्री केली जाते. त्याकरिता याची रितसर शेतीही केली जातो. ओसाड माळराने व मानवीवस्तीपासून दूर असणाऱ्या भागात याची लागवड केली जाते. शेंगांमधून बिया काढतांना त्यावरील लव उडणार नाही याची काळजी घेण्यात येते. या लवीमध्ये तसेच फुलांच्या बाह्य पटलावरील लवीमध्ये Serotonin नावाचा पदार्थ असतो. त्यामुळे भयंकर खाज सुटते.

चुकून कधी या शेंगांचा किंवा फुलांच्या बाह्यपटलाचा संपर्क आला किंवा अनवधानाने आपल्या कपड्यावर पडले तर वेळीच काळजी घेणे आवश्यक आहे. अंगावर पडल्यास किंवा हाताला लागल्यास पाण्याने न धुणेच उत्तम. कारण Serotonin पाण्यात विरघळते व जिथे ते लागेल तेथे खाज येते. त्यावर भारतात प्रचलित असलेला उपाय म्हणजे गाईचे शेण लावून चोळणे. दुसरा उपायही करून पाहण्यासारखा आहे. जेथे खाजकुयरीचा स्पर्श झाला त्यावर घट्ट चिखल लावून तो वाळला की अलगद, भेगाळलेला भाग ओढून काढावा. चिखलासोबत बारीक काटेही बाहेर येतील. कपड्याला लागल्यास ते इतर कपड्यांसोबत न ठेवता किमान ४८ तास पाण्यात बुडवून ठेवावे व नंतरच धुऊन वापरावेत.

खाजकुयरी अशी उपद्रवकारक आहे तशी उपयोगाची देखील आहे. निसर्गात असणारी प्रत्येक गोष्ट पर्यावरणाला पुरक अशीच आहे. सर्वांचा समतोल कसा राखावा हे निसर्गाला चांगलेच माहीत आहे. मात्र माणूस स्वतःच्या स्वार्थासाठी हा समतोल बिघडवत असतो. खाजकुयरीमध्ये वत्राचे प्रमाण भरपूर असल्याने त्यापासून उत्तमप्रकारचे हिरवे खत मिळते. वेली जमीनीत गाडून त्यापासून खत करता येते. शिवाय जनावरांसाठी उत्तम चारा म्हणूनही त्याचा वापर करण्यात येतो. एवढेच की स्वतःची काळजी घेऊन याचा वापर कसा करावा हे ज्याचे त्याने ठरवावे. मात्र औषधी म्हणून वापरतांना तज्ज्ञांचा सल्ला घेणेच उत्तम.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

•••

# ऑक्सफर्ड, केंब्रीज शैक्षणिक सहल

*विद्या प्रसारक मंडळाने आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीत ऑक्सफर्डमधील काही ठिकाणांना भेट देऊन झाल्यावर लिहिलेल्या रोजनिशीचे हे एक बोलके पान आहे - संपादक*

लंडनच्या हिथ्रो विमानतळावर सकाळी ६.३० ला उतरलो. T-३ च्या भव्यदिव्य विमानतळापुढे लंडनचा हिथ्रो अतिशय साधा वाटला. पण नजरेत भरणारी पहिली गोष्ट म्हणजे अप्रतिम स्वच्छता. नजरेच्या टप्प्यात कुठंही कचऱ्याचा कपटा नाही. मला सहज आठवलं, आमच्या एका मित्रानं इंग्लंडच्या राणीला किती स्वच्छता हवी असेल असा प्रश्न पडला तेव्हा तिचं उत्तर, 'मला शिपच्या डेस्कवर खाली बसून जेवता येईल इतकी स्वच्छता हवीय'. असो.

सकाळी उतरल्यावर पहिलं काम होतं मोबाईल कार्ड घेणे. त्या लोकल स्टेशनवर मोबाईलच्या दुकानाचा मालक भारतीय दिसला. त्याच्याबरोबर हिंदीतच संभाषण सुरू, किती बरं वाटतं ना... आपला माणूस परमूलखात भेटल्यावर.

हिथ्रो बसस्टॉपवरून ऑक्सफर्डचा प्रवास १०० मिनिटांचा. तोही अगदी नेत्रसुखद. सर्वत्र हिरवीगर्द झाडं अन् स्वच्छ रस्ते.

ऑक्सफर्डला उतरल्यानंतर पहिलं ठिकाण पाहिलं ते ॲशमोलियन म्युझिअम. इथं सर्व प्रकारच्या प्राचीन वस्तूंचा संग्रह आहे. सर्वात महत्त्वाची इथली मला आवर्जून लक्षात राहिलेली गोष्ट म्हणजे ममी (इजिप्शिअन) कशी तयार करण्यात येते. ममी तयार करण्याच्या प्रक्रियेची एक फिल्मच इन्स्टिट्यूटने तयार केली आहे. इथली भारतीय दालनं पाहिली. भारतातून सर्वात अगोदर आणलेली १००० सालापूर्वीची शिवमूर्ती पाहिली. त्यानंतर रोमन संस्कृतीतील हुबेहूब पुतळेही लक्षणीय आहेत. तसेच इजिप्शिअन संस्कृतीचे दालनही त्यातल्या Original Mummies मुळे खुपच ज्ञानवर्धक वाटलं.

त्यानंतर डॉ. आगरकरांनी आम्हाला, ज्याठिकाणी काही सुधारणावादी ख्रिश्चन धर्मगुरूंना जाळण्यात आले ती जागा दाखविली. कारण काय तर, मूळ ख्रिश्चन कॅथलिक धर्माला विरोध. धर्म मग तो कोणताही असो; कट्टरता आली की काय होतं याचं हे उत्तम उदाहरण. साक्षात करुणा शिकविणाऱ्या येशूच्या धर्मात...

त्यानंतर कॉलेज बिलॉल ज्यात श्यामजी कृष्ण वर्मा शिकले. पुढे त्यांनी सावरकरांना मदत केली. तसंच बरेचसे Viceroy इथचं शिकले जे भारतात आले.

त्यानंतर Indian Institute जे सुरू केलं मन्युअर विल्यम्सने, ज्याने भारतीय व इंग्रजांनी एकत्र आले पाहिजे अशी भूमिका मांडली व त्यासाठी संस्थात्मक काम असावे अशी ज्याची धारणा होती. इथं इमारतीतच एक ताम्रपत्र लावलेले आहे. ज्यात मात्र आंग्ल हे उच्च आहेत अशी धारणा प्रकट केली आहे.

त्यानंतर इथला इंडिया गेटसारखा विजय स्तंभ पाहिला. डॉ. बेडेकर एक गोष्ट वारंवार आवर्जून सांगत होते ती ही की, इथल्या तसंच अमेरिकेच्या विचारवंतात कितीही मतभेद असतील, मारामाऱ्या असतील एक गोष्ट मात्र ते अभिमानाने मिरवतात ते म्हणजे त्यांच्या देशातल्या सैनिकांनी केलेली कामगिरी व त्यांची आठवण. मला वाटतं भारतात War Memorial ही संकल्पनाच

नाही. कारगिल युद्धानंतर कारगिलला जे झालं ते War Memorial कदाचित अलीकडलं War Memorial असावं.

त्यानंतर पाहिलं ते New College नावान न्यू असलं तरी ते इथलं म्हणजे ऑक्सफर्ड मधलं जुनं कॉलेज आहे. साधारणतः १३ व्या शतकातलं. सहसा इथली कॉलेजेस आतुन पाहता येत नाहीत. मात्र न्यू कॉलेज पाहता येतं. कॉलेजच्या आवारातच नव्हे तर कॉलेज रस्त्यावरून जातानाच इथली प्राचीनता लक्षात येण्यास सुरुवात होते.

कॉलेजेसची रचना साधारणतः Church किंवा Chappel, वसतिगृह, वाचनालय, वर्गखोल्या अशी चौकोनी असते आणि यांच्या मधोमध प्रशस्त अशी मोकळी जागा, हिरवळ, साधारणतः आपल्या चौसोपी वाड्याची रचना.

इथलं चॅपेल अतिशय प्राचीन. इथल्या चॅपेलच्या भिंतीवर जे काम आहे त्यात १३ व्या शतकात रंगवलेल्या ख्रिस्ती धर्माशी निगडित अशा glass paintings आहेत. ज्या आजच केल्यात असं वाटतं. मला फादर फ्रान्सिस दिब्रेटो यांनी दिलेल्या बायबलच्या प्रतीच्या कव्हरची आठवण झाली.

त्यानंतर बॉडलिअन (Bodlein Liabries) मध्ये चालू असलेल्या शेक्सपिअरच्या वाङ्मयातून Death या Concept वरच्या दालनाला भेट दिली. या संकल्पनेवरची पुस्तकंही आठवण म्हणून खरेदी केली. त्यानंतर Blackwell या प्रसिद्ध art store ला भेट दिली. एक दिवसाचं बाळ, या संकल्पनेवर आधारित डायरी घेतली.

संध्याकाळी परतल्यावर डॉ. बेडेकरांनी मुलांकडून उजळणी घेतली. ज्याचा सारांश म्हणजे इंग्रजांनी जगावर राज्य केलं, त्याचं कारण म्हणजे इथल्या लोकांची ज्ञानाप्रती असलेली आस, त्यांचं समर्पण, एखाद्या गोष्टीच्या मुळाशी जाऊन त्यांची विचार करण्याची पद्धत अन् त्यातून आलेलं शहाणपण. शहाणपण फक्त पुस्तकांतून येत नसतं, ते येतं त्याच्या वापरातून अन् त्यांनी जे ज्ञान कमावलं, त्यासाठी प्रचंड मेहनत घेतली व त्याचं वास्तव जीवनात रूपांतर करून ते परावर्तित केलं ते आपल्या विशाल साम्राज्यात.

डॉ. म्हणाले, 'तसं Language, Logic, Rhetoric म्हणजे एखादी गोष्ट, आपले मुद्दे ठासून सांगणं (Language, Logic, Rhetoric) ही त्रिसूत्री. आपण हेच विसरलो किंवा आपल्याला विसरवलं गेलं? म्हणून आपण पराभवाच्या मानसिकतेत आहोत का? अन् त्यांनी त्यावर प्रभूत्त्व मिळवलं म्हणून ते जेते आहेत का?

डॉ. बेडेकरांच्या लंडनहून पाठवलेल्या मेलमध्ये त्यांनी म्हटलं होत की, आपला हा अभ्यासदौरा फक्त मौज-मजा नाही, तर आपल्याला इंग्लंड नावाच्या महाराष्ट्रा एवढ कमी अधिक आकारमान अन् लोकसंख्या जगाच्या १% असणाऱ्या देशानं ज्या देशाच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही इतकं साम्राज्य पसरवलं त्यांची मानसिकता काय? हे समजून घेणं. हे म्हणजेच तिथली संस्कृती. काल आपण पाहिलं की त्यांची ज्ञानलालसा किती प्रचंड होती.

आज सकाळी बसनं गेलो. सर्व प्रथम पाहिले ते University कॉलेज. या कॉलेजमध्ये विल्यम जोन्स ज्ञानदानाच्या Pose मध्ये दाखवलाय अन् त्याच्या पायाशी पंडित अतिशय नम्रपणे ते ज्ञान ग्रहण करतात असं दाखवलंय. त्यांच्या खालची पट्टी विल्यम जोन्स Who studied the hindu and mohemaden law असं लिहिलंय. विल्यम जोन्सने पहिल्यांदा जगाला भारतातील तथाकथित कायद्यांचा परिचय करून दिला. खरंतर विल्यम जोन्सला पंडितांनी शिकवलं पण इथं दाखवलंय पंडित त्याच्या पायाशी. ही वांशिक वरचढता दाखवण्याचा

प्रयत्न आहे. आपण कृतज्ञ असतो गुरूप्रती अन् विल्यम जोन्स?

आजच मला वाटलेलं सर्वात आकर्षक ठिकाण म्हणजे व्हर्जिन मेरी चर्च. हे चर्च अतिशय भव्य आहे. इथल्या पहिल्या मजल्यावरच्या छतावर म. गांधी पद्मासनात बसलेले दाखवले आहेत. खरी मजा चर्चच्या वर जाऊन ऑक्सफर्ड शहर पाहाण्यासारखे आहे. ऑक्सफर्ड शहराचे चहुबाजूंनी दर्शन या चर्चवरून होतं. अतिशय सुरेखपणे बसवलेल्या बिल्डिंग, सुंदर रस्त्यांचं दर्शन केवळ अप्रतिम. ऑक्सफर्डची University च official church. यानंतर पाहिलं ते बोडोलियन लायब्ररी. तिथं साधारणतः १.५ कोटीच्या जवळपास पुस्तक असावीत अस सांगितलं जात. इथ वेगवेगळ्या प्रकारच्या School च्या पाट्या आजही पाहायला मिळतात, School of Logic, School of Astronomy वगैरे.

खरंतर ऑक्सफर्ड, केंब्रीज ही १३ व्या, १४ व्या शतकातली विद्यापीठे. आपल्याकडे नालंदा, तक्षशिला ही विद्यापीठं ही ५ व्या शतकातली विद्यापीठं. पण आपण करंटे. आपण हे आपलं वैभव जपून ठेवू शकलो नाही. त्यावेळी आपण ज्ञानाचे उपासक होतो. त्यावेळी चीनहून ह्युंअगत्संगसारखे विद्वान आपल्याकडे येऊन गेले आणि आपण त्यावेळी प्रगत समजलो जायचो. योगायोगाने मी नालंदा विद्यापीठाचे अवशेषही पाहिलेत अन् जाणवलं ते असं असाव का, की लंडन दुसऱ्या महायुद्धात होरपळून निघालं. पण या ऑक्सफर्ड, केंब्रीज ही ज्ञानकेंद्रं त्यातून शाबूत राहिली अन् आपण मात्र मतभेदापायी (आपल्याच भागातील) ज्ञानकेंद्रंच जाळून टाकली.

रॅडकिल्फ कॅमेरा ही नितांत सुंदर वास्तू. ऑक्सफर्डचं Symbol म्हणून वापरली जाते. History of Science Museum मध्ये जगातल्या वेगवेगळ्या शोधांबद्दलची उपकरण अतिशय जपून ठेवली आहेत. लक्षवेधी उपकरण म्हणजे पाश्चिमात्य. जेव्हा पृथ्वी सपाट आहे असं म्हणत, तेंव्हा आपण भूगोल असं म्हणायचो अन् तशा अर्थाचं यंत्र इथं आहे.

त्यानंतर Natural History Museum पाहिलं. ज्यात मासा ते डायनोसॉर असे सगळे कसे उन्नत झाले याची माहिती आहे. वास्तू प्रेक्षणीय. मी थकलो होतो. त्यामुळे फार काही पाहता आलं नाही.

याच्या शेजारीच Rhodes House आहे. आज बुद्धपौर्णिमा, सकाळी भूषणनं ऑक्सफर्ड मधल्या विहाराचा पत्ता पाठवला. त्यामुळे संध्याकाळी इथल्या विहारात गेलो. सामुहिक वंदना आणि त्यानंतर अर्धा तासाचं ध्यान. खूप छान वाटलं. पहिल्यांदाच इथल्या टॅक्सीत बसलो.

व्हर्जिन मेरी चर्चमध्ये विल्यम जोन्सच्या हातात मनुस्मृती दाखवलीय. ज्या चर्चमध्ये ख्रिस्तशिवाय इतर काहीही दाखवल जात नाही तिथं विल्यम जोन्सच्या हातात मनुस्मृती?

**– सुभाष एंगडे**

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# भारतीय इतिहासातील महान सम्राट- चंद्रगुप्त मौर्य

*प्राचीन काळात होऊन गेलेल्या चंद्रगुप्त मौर्य ह्या भारतीय सम्राटाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

भारताला अतिप्राचीन सभ्यता लाभलेली आहे हे सर्वज्ञात आहे. त्याचप्रमाणे भारताला अडीच ते तीन हजार वर्षांचा इतिहास आहे. हजारो वर्षांपासूनची विचारसरणी, राहण्याची शैली व धार्मिक तत्त्वे आजही बहुतांशी भारतीय आपल्या जीवनामध्ये आचरणात आणताना दिसतात. नेमके याचेच भारताचा अभ्यास करणाऱ्या पश्चिमेकडील (युरोप व अमेरीका) संशोधकांना व विद्वानांना कौतुक वाटते.

प्राचीन भारताचा इतिहास सुमारे तीन हजार वर्षापूर्वीच्या सिंधु संस्कृतीपासून सुरू होतो. सिंधु संस्कृतीनंतर भारतात साधारणतः अडीच हजार वर्षांपूर्वी वैदिक संस्कृती उदयास आली असे म्हणता येईल. सिंधु संस्कृती विषयी लिहिताना इतिहासकारांना प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांचाच उपयोग करावा लागतो. याचे कारण म्हणजे त्याकाळातील 'लिपी' वाचण्यात आजपर्यंत संशोधकांना व अभ्यासकांना यश आलेले नाही. त्यामुळे उत्खननात सापडलेल्या विविध वस्तूंच्या आधारे त्याचप्रमाणे त्याकाळातील इतर अवशेषांचा अभ्यास करूनच सिंधु संस्कृतीविषयीची माहिती आपणास देण्याचे काम पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी व इतिहासकारांनी केले आहे.

वैदिक संस्कृतीच्या बाबतीत मात्र आपणास ठोस असे लिखीत स्वरूपाची अनेक साधने उपलब्ध आहेत. ही साधने मुख्यतः धर्मग्रंथांच्या स्वरूपात आहेत. याशिवाय प्राचीन काळात भारतात येऊन गेलेल्या अनेक परकीय प्रवाशांच्या इतिवृत्तातांतून देखील आपणास त्या काळातील माहिती मिळते. प्राचीन भारताच्या इतिहासाची माहिती देणारी इतर महत्त्वाची साधने म्हणजे पुरातत्त्वीय साधने होत. ही साधने विविध प्राचीन इमारती, नगरे व इतर वास्तूंचे अवशेष, लेणी, कोरीव लेख, शिलालेख, स्तंभलेख इत्यादी स्वरूपात आढळतात. ह्या सर्व पुरातत्त्वीय साधनांचा अभ्यास करून देखील प्राचीन इतिहासाविषयी आपणास बऱ्याच प्रमाणात माहिती मिळते. मौर्य सम्राट अशोकाचे शिलालेख तर याबाबतीत खूपच महत्त्वाचे ठरतात. अशोकाच्या शिलालेखांवरून त्याच्या काळातील बरीच माहिती मिळण्यास मदत होते.

प्राचीन काळापासून भारतात अनेक महत्त्वाच्या घटना घडलेल्या आहेत. ह्यापैकी एक महत्त्वाची घटना म्हणजे इसवी सन पूर्व ६ व्या शतकात बौद्ध व जैन धर्मांची स्थापना व सोळा महाजनपदे अस्तित्वात येणे ही होय. नेमक्या ह्याच काळापासून आपल्याला प्राचीन भाषाविषयीची लिखीत व इतर साधने मोठ्या प्रमाणात मिळायला सुरुवात होते.

प्राचीन भारतातील पहिल्या मोठ्या साम्राज्याची स्थापना 'नंद' कुळातील राजांनी केल्याचे उल्लेख आढळतात व हे साम्राज्य म्हणजे मगधचे साम्राज्य होय. नंदांनंतर खऱ्या अर्थाने अखिल भारतीय स्वरूपाचे साम्राज्य उभारण्याचे श्रेय चंद्रगुप्त मौर्य ह्या मौर्य कुलातील राजाला, सम्राटाला जाते. मौर्य कालाविषयीची व प्रामुख्याने चंद्रगुप्ताच्या कादकीर्दीविषयीची माहिती आपणास हिंदू, बौद्ध तसेच जैन धर्मग्रंथ व विविध ग्रीक साधनांतून मिळते. ह्या कालाविषयी माहिती देणारे सर्वात महत्त्वाचे लिखीत साधन म्हणजे चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारातील ग्रीक राजदूत मेगास्थनीस (Megasthenes) ह्याने लिहिलेला 'इंडिका' (Indica) नामक ग्रंथ होय. त्याचप्रमाणे कौटील्य लिखीत 'अर्थशास्त्र' देखील ह्या काळावर बराच प्रकाश टाकते.

---

मित्र गरीब आहे की श्रीमंत आहे हे महत्त्वाचं नसून, तो तुमच्या संकटात किती खंबीरपणे तुमच्या पाठीशी उभा राहतो हे महत्त्वाचं आहे.

चंद्रगुप्त मौर्याने धनानंद या 'नंद' राजघराण्यातील शेवटच्या राजाचा पाडाव करून मौर्य राजघराण्याची स्थापना केली. नंद राजघराण्याची स्थापना महापद्म नंद याने केली होती. पुराणांमध्ये महापद्म नंद हा शिशुनाग राजघराण्यातील शेवटचा राजा महानंदी याचा क्षुद्र स्त्रीपासून झालेला पुत्र होता असे संदर्भ आढळतात. तर जैन परंपरेनुसार त्याची आई क्षत्रीय व वडील न्हावी होते. महापद्मानंतर नंद घराण्याच्या जवळ-जवळ आठ राजांनी मगधवर राज्य केले. ह्या घराण्यातील शेवटचा राजा धनानंद हा जनतेमध्ये अप्रिय होता. त्याने लोकांवर अनेक जुलमी कर लादले होते. त्यामुळेदेखील प्रजा त्याच्यावर नाखुश होती. ह्याचा फायदा चंद्रगुप्त मौर्यासारख्या तरुणाने घेतला व तत्कालीन महान विद्वत्तापूर्ण व्यक्तिमत्त्व चाणक्य यांच्या मार्गदर्शनाखाली धनानंदाचे राज्य उलथवून लावले.

चंद्रगुप्त मौर्याच्या पार्श्वभूमीविषयी अनेक ऐतिहासिक साधने व इतिहासकारांमध्ये मतैक्य आढळत नाही. इसवी सन पूर्व ३२२ च्या आसपास चंद्रगुप्त मगधचा राजा झाला असे दाखले सापडतात. त्याला राजा बनविण्यात भारतीय इतिहासातील थोर विचारवंत व विद्वान चाणक्य यांना मोठे श्रेय जाते. चाणक्य हे विष्णुगुप्त व कौटिल्य ह्या नावांनी देखील ओळखले जातात. चाणक्य ऊर्फ कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. ह्या ग्रंथात त्यांनी आदर्श राज्यकारभार कसा असावा याचे विस्तृत विवेचन केले आहे. चंद्रगुप्त मौर्याच्या कौटुंबिक पार्श्वभूमीविषयी विविध ऐतिहासिक साधनांमधून वेगवेगळी माहिती मिळते.

इसवी सन पूर्व ३२१ च्या आसपास प्राचीन ग्रीसमधील मॅसिडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट (ह्याला भारतामध्ये सिकंदर असे देखील संबोधतात) याने वायव्य भारतावर आक्रमण केले असे इतिहासकार म्हणतात. अलेक्झांडर हा मूळचा प्राचीन युरोपमधील मॅसिडोनिया (Macedonia) ह्या राज्याचा राजा होता. तो इसवी सन पूर्व ३३६ मध्ये मॅसिडोनियाचा राजा झाला होता. गादीवर आल्यावर त्याने संपूर्ण जग जिंकण्याचे ठरविले. त्यानुसार त्याने सध्याच्या इजिप्तमधील उत्तरेकडचा बराचसा भाग त्याचप्रमाणे अरबस्तानातील अनेक प्रदेश जिंकले व भारतापर्यंत येऊन थडकला. अलेक्झांडर जेव्हा वायव्य व उत्तर भारतात आला तेव्हा भारतातील प्रामुख्याने मध्य व उत्तर-पूर्वेकडील भागांवर नंद राजघराण्याचे राज्य होते. या राज्यास वा साम्राज्यास मगधचे साम्राज्य म्हणून ओळखले जाई. मगध हे अतिशय प्राचीन अशा महापदांपैकी एक जनपद होते.

इसवी सन पूर्व ६ व्या शतकात उत्तर, मध्य व पूर्व भारतात आपणास सोळा महाजनपदे अस्तित्वात आलेली दिसतात. त्यापैकी वर नमूद केल्याप्रमाणे 'मगध' हे एक महाजनपद होते. उर्वरीत पंधरा महाजनपदांची नावे पुढीलप्रमाणे होती - अंग, अस्सका (अस्माका), अवंती, चेदी, गांधार, काशी, कंबोज, कोसल, कुरू, मल्ला, मच्छ (मत्स्य), पांचाल, सुरसेन, व्रीजी व वत्स (वम्स). बिंबीसार हा इसवी सन पूर्व ६ व्या शतकातील मगधचा पहिला प्रसिद्ध राजा होता असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्याचा कार्यकाळ साधारणतः इसवी सन पूर्व ५५८ ते ४९१ होता असे इतिहासकार सांगतात. बिंबिसार हा श्रेनिक या नावाने देखील ओळखला जात असे. तो 'हरयंक' या राजवंशातील राजा होता. बिंबिसार हा शूर राजा होता व त्याने 'अंग' हा प्रदेश जिंकला होता. बिंबिसार व महात्मा गौतम बुद्ध हे समकालीन होते. तो गौतम बुद्धांचा मित्र होता व त्याने बौद्ध धर्माला राजाश्रय दिला होता. बिंबिसारा नंतर त्याचा पुत्र अजातशत्रू हा मगधच्या गादीवर बसला. अजातशत्रू हा देखील शूर राजा होता. त्याने आपले पिताश्री बिंबिसार याने सुरू केलेले आजूबाजूचे प्रदेश काबीज करण्याचे धोरण सुरू ठेवले व मगधच्या राज्याचे मोठ्या साम्राज्यात रूपांतर केले. अजातशत्रू हा हरयंक राजघराण्यातील शेवटचा 'महान' सम्राट ठरला. त्याच्यानंतर उदयीन, अनुरुद्ध हे राजे गादीवर आले. हरयंक राजघराण्याची सत्ता संपुष्टात आणण्यात शिशुनाग ह्या व्यक्तीस यश आले. त्याने

शिशुनाग राजघराण्याची स्थापना केली. शिशुनाग हा वाराणसी (बनारस)चा प्रांताधिकारी होता अशी माहिती सिलोनच्या साहित्य परंपरेतून मिळते. शिशुनागाला मगधच्या जनतेनेच बंड करून सिंहासनावर बसविले अशी माहिती काही प्राचीन ग्रंथांतून मिळते. ह्या शिशुनाग राजघराण्यानंतर मगधमध्ये नंद राजघराण्याची सत्ता स्थापन झाली. नंद राजघराण्यातील पहिल्या राजाचे नाव महापदम नंद असे होते. महापदमनंदाच्या कुळाविषयी ऐतिहासिक साधनांमध्ये मतैक्य नाही. काही साधनांच्या आधारे असे म्हटले जाते की, तो महानंदीन ह्या राजाचा शुद्र आईपासून झालेला मुलगा होता. तर काही साधने व प्रामुख्याने जैन धर्माशी संबंधीत साधनांमध्ये तो एका राजदरबारातील उच्चकुलीन स्त्रीस एका न्हाव्यापासून झालेला मुलगा होता. काही तज्ज्ञांच्या मते तो स्वतः न्हावी होता व राजाची हत्या करून राणीबरोबर विवाह करून त्याने सिंहासन बळकावले. काहीही असो, ह्या महापदमनंदाने स्वतःस खूप पराक्रमी राजा म्हणून सिद्ध केले व मगधचे साम्राज्य विस्तारण्यास मोठा हातभार लावला. धनानंद हा नंद कुळातील शेवटचा राजा ठरला.

चंद्रगुप्त मौर्याने धनानंद विरुद्ध लढा देऊन नंद राजघराण्याचा अस्त केला. चंद्रगुप्त मौर्याच्या पार्श्वभूमीविषयी देखील आपणास वेगवेगळ्या साधनांपासून वेगवेगळी माहिती मिळते. ऑस्टीन ह्या ग्रीक लेखकानुसार चंद्रगुप्त हा उच्चकुलीन नव्हता. जैन लिखीत परंपरानुसार चंद्रगुप्त हा एका गावातील गावच्या प्रमुखाच्या मुलीचा मुलगा होता. हे गाव मोराला पाळणाऱ्या व त्या पक्षाला पाळीव पक्षी बनविणाऱ्या लोकांचे गाव होते. त्यामुळेच मौर्य पोशकांच्या म्हणजेच मोर पाळणाऱ्यांच्या गावात जन्मास आलेल्या चंद्रगुप्ताच्या वंशाचे 'मौर्य' असे नाव पडले अशी माहिती आपणास जैन परंपरेमधून मिळते. काही साधनांनुसार तो नंद घराण्यातील राजाला 'मुरा' ह्या राणीपासून झालेला मुलगा होता. मात्र, बौद्ध साहित्याच्या आधारे असे म्हणता येते की, चंद्रगुप्त मौर्य हा क्षत्रीय कुळातील होता. 'महावंश' ह्या बौद्ध धर्मीय ग्रंथानुसार चंद्रगुप्ताच्या क्षत्रिय कुळाचे 'मोरीया' हे नाव होते. यावरून 'मोरीयां'चे अपभ्रंश होऊन 'मौर्य' झाले असावे असा तर्क लावता येतो. हा 'मोरीया' वंश गौतम बुद्धांच्या काळापासून अस्तित्वात होता अशीही माहिती आपणास ह्या ग्रंथावरून मिळते. त्याचप्रमाणे 'महापरीब्बानवुत्त' ह्या बौद्ध ग्रंथावरून 'मोरीया' हे 'पिफ्फलीवन' या प्रदेशाचे राज्यकर्ते होते व त्यांनी मल्लांना (मल्ल-महाजनपद) गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या शरीराचे पवित्र अवशेष (relics) देण्यात यावेत अशी विनंती करून एक दूत पाठवला होता. ह्याचे कारण म्हणजे गौतम बुद्ध क्षत्रिय कुळात जन्माला आले होते व त्यांनी संपूर्ण जगाला कल्याणकारी अशा बौद्ध धर्माची शिकवण दिली व त्यामुळे मोरीयांना क्षत्रिय म्हणून महात्मा गौतम बुद्धांविषयी अत्यंत आदर, अभिमान व आपुलकी होती असे सिद्ध होते. अशा ह्या 'मोरीया' कुळात चंद्रगुप्ताचा जन्म झाला अशी माहिती देणारी बौद्ध साहित्यिक परंपरा बहुतांशी इतिहासकारांनी आजमितीला मान्य केलेली आहे.

मोरीयांचे पिफ्फलीवन हे राज्य सध्याच्या उत्तर प्रदेशात होते असा अभ्यासकांचा तर्क आहे. चंद्रगुप्ताच्या वडिलांचा आपल्या सरहद्दींचे संरक्षण करताना मृत्यू झाला. त्यामुळे त्याच्या आईला आपला प्रदेश सोडून फार दूर जावे लागले व ती पाटलीपुत्र येथे आली. पाटलीपुत्र म्हणजे सध्याच्या बिहार ह्या राज्याची राजधानी असलेले पाटणा हे शहर होय. म्हणजेच पाटणा शहरच प्राचीन काळी पाटलीपुत्र ह्या नावाने ओळखले जायचे असे अभ्यासक म्हणतात. येथे एका गावात चंद्रगुप्ताच्या आईने चंद्रगुप्ताला जन्म दिला व सुरुवातीस त्याचे पालनपोषण गुराख्यांनी केले व नंतरच्या काळात तो शिकार करणाऱ्या जमातीमध्ये वाढला.

लहानपणापासूनच चंद्रगुप्ताला राजा व राज्यकारभार यांच्याविषयी आकर्षण होते. त्यामुळे तो मुलांमध्ये खेळताना राज्यकारभारविषयक खेळ खेळायचा. ह्या खेळामध्ये राजाचा दरबार भरलेला आहे व राजा, त्याचे मंत्री व प्रजा हे राजदरबारात उपस्थित आहेत व राजा

सर्व गोष्टी आपल्या मनासारख्या झाल्याच पाहिजेत हा आग्रहच माणसांच्या सर्व दुःखांना कारणीभूत ठरतो- वामनराव पै

लोकांच्या समस्येचे निवारण करत आहे व न्यायनिवाडा करत आहे असे चित्र उभे केले जात असे. ह्या खेळात चंद्रगुप्त स्वतः राजा बनत असे व आपल्या मंत्र्यांना आदेश व सुचना देण्याचा अभिनय करत असे. एकदा चंद्रगुप्ताचा आपल्या सवंगड्यांसोबत हा खेळ चालू असताना योगायोगाने भारतीय इतिहासातील महान विद्वान 'चाणक्य' हे तेथून जात होते व त्यांनी चंद्रगुप्ताला पाहिले. चंद्रगुप्ताची ती चुणूक व त्याच्यातील नेतृत्वगुण त्यांच्या नजरेत तात्काळ भरले व त्यांना त्या मुलात भविष्यातील महान सम्राट दिसला. अशाप्रकारे, चाणक्यांनी चंद्रगुप्ताला लहानपणीच आपल्यासोबत 'तक्षशीला' ह्या ठिकाणी नेले. चाणक्यांचा तेव्हा विद्येची नगरी 'तक्षशीला' येथे निवास होता.

प्राचीन काळात किंवा चंद्रगुप्ताच्या काळात 'तक्षशीला' हे शिक्षणाचे प्रमुख केंद्र होते. त्याकाळात 'तक्षशीला' ह्या शहरात भारतातील व भारताच्या बाहेरून देखील अनेक लोक शिक्षण घेण्यासाठी येत असत. तक्षशीला हे शहर वायव्य भारतात म्हणजेच आताच्या पाकिस्तानात होते. सध्याच्या वायव्य पाकिस्तानातील रावळपिंडी या शहरात प्राचीन तक्षशीला नगरीचे अवशेष आढळले वा सापडले आहेत. ह्या तक्षशील नगरीत चाणक्यांचा वास होता. महान चंद्रगुप्ताला खेळत असताना राजाच्या भूमिकेत पाहून आचार्य चाणक्यांना जाणवले की, ह्या लहान मुलाचा उपयोग राष्ट्र उभारणीसाठी करता येऊ शकतो व ते चंद्रगुप्ताला आपल्यासोबत घेऊन गेले. त्यांनी चंद्रगुप्ताला विविध कला व शास्त्रांमध्ये प्रवीण केले. प्रामुख्याने चंद्रगुप्ताने शस्त्र व युद्धविद्या आत्मसात केलेली आढळते. पुढे जाऊन ह्याच चाणक्यांच्या प्रखर बुद्धिमत्तेमुळे व चंद्रगुप्ताच्या शौर्यामुळे नंद घराण्याचा अस्त झाला.

आचार्य चाणक्यांनी चंद्रगुप्ताच्या मदतीने आक्रमणकर्त्या ग्रीकांविरुद्ध लढा देण्याचा निकराचा प्रयत्न केला. अगोदर उल्लेखिल्ल्याप्रमाणे इसवी सन पूर्व ३२१ मध्ये अलेक्झांडर द ग्रेट हा ग्रीक राजा भारतावर चाल करून आला व सध्याचा पाकिस्तान व अफगानिस्तानचे काही भाग त्याने ताब्यात घेतले होते. चाणक्यांना भारत ग्रीकांपासून मुक्त तर करावयाचा तर होताच मात्र त्याचसोबत त्यांना मगधमधील धनानंदची जुलमी राजवटदेखील संपुष्टात आणायची होती. धनानंद हा नंद कुळातील राजा होता. असे म्हटले जाते की, धनानंदाला धन व संपत्तीची खूप लालसा होती. त्यामुळे त्याने जनतेवर अनेक जुलमी कर लादले होते. एवढेच नव्हे तर राज्याचे द्रव्य त्याने स्वतःच्या स्वार्थासाठी लपवून ठेवले होते. अशा ह्या राजाच्या कारभाराला जनता खरोखरच कंटाळली होती. त्यामुळे आचार्य चाणक्यांनी धनानंद व पर्यायाने नंद कुळाचा नाश करण्याची प्रतिज्ञाच घेतली होती.

आचार्य चाणक्य हे अतिशय विद्वान असल्यामुळे त्यांना चांगले ठाऊक होते की, देशावर परकीयांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर देशाची संपत्ती परदेशात जाते व देशाचे व पर्यायाने जनतेचे अतोनात नुकसान होते. त्यामुळेच आचार्य चाणक्य व चंद्रगुप्ताने सैन्य उभारून ग्रीकांविरुद्ध लढा देण्याचे मोठे काम केले. काही अभ्यासकांच्या मते चंद्रगुप्त मौर्य हा अलेक्झांडर पंजाबमध्ये असताना त्याला जाऊन भेटला होता व त्याचा धिक्कार व अपमान केला होता. अलेक्झांडर ह्या घटनेनंतर एवढा क्रोधीत झाला होता की, त्याने चंद्रगुप्ताला बंदी बनवून ठार करण्याचे आदेश दिले होते. मात्र, चंद्रगुप्ताने स्वतःची ह्या संकटातून सुटका करून घेतली. चंद्रगुप्त व आचार्य चाणक्यांनी उभारलेल्या सैन्यातील सैनिकांना ग्रीक लेखक जस्टीन याने लुटारू व भाडोत्री सैनिक असे म्हटले आहे. अलेक्झांडरने भारतावर आक्रमण केल्यानंतर पंजाबपर्यंत मजल मारली. त्याने वायव्य भारतातील अनेक भारतीय राजांचा पराभव केला. तक्षशिलाच्या 'अंभी'सारख्या राजांनी ह्या परकीय शत्रूबरोबर मैत्री केली तर 'पुरू'सारख्या राजांनी लढाई करून आपल्या राज्याचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. पुरूचे राज्य साधारणतः पंजाबमधील झेलम व चिनाब ह्या नद्यांच्यामधील

---

यश हे सोपे, कारण ते कशाच्या तरी तुलनेत असते; पण समाधान हे
महाकठीण, कारण त्याला मनाचीच परवानगी लागते!

प्रदेशांमध्ये पसरलेले होते. पुरूला अलेक्झांडरने बंदी केले व त्याला कोणत्या प्रकारची वागणूक द्यावी असा प्रश्न केला. त्यावेळी अतिशय निर्भिडपणे एका राजाने दुसऱ्या राजाला ज्या प्रकारची वागणूक द्यावी त्या प्रकारची वागणूक अलेक्झांडरने द्यावी अशा स्वरूपाचे स्वाभिमान दर्शवणारे उत्तर पुरूने ह्या परकीय आक्रमणकर्त्याला दिले. अलेक्झांडरला वाटले असावे की, पुरू स्वतःची सुटका करून घेण्यासाठी त्याच्याकडे दया-याचना करेल. मात्र, पुरूचे उत्तर ऐकून अलेक्झांडर अवाक झाल्यापासून राहिला नसेल. पुरूचे हे उत्तर अलेक्झांडरला एवढे आवडले की, त्याने पुरूला त्याचे स्वातंत्र्य बहाल केले. इतिहासात ही घटना फार प्रसिद्ध आहे.

असे म्हटले जाते की, अलेक्झांडरला बियास ही नदी ओलांडून मगधच्या साम्राज्याकडे कूच करण्याची इच्छा होती. त्यावेळी धनानंद हा मगधचा सम्राट होता. काही इतिहासकार सांगतात की, अलेक्झांडरचे सैनिक अनेक वर्ष घराबाहेर राहून व लढाया करून कंटाळले होते व त्यांना परत स्वगृही जाण्याचे वेध लागले होते. त्यांनी अलेक्झांडरच्या पुढे कूच करण्याच्या निर्णयाला विरोध केला व लढण्यास नकार दिला. त्यामुळे अलेक्झांडरला वायव्य भारतातून परतावे लागले. याउलट काही इतिहासकार म्हणतात की, धनानंदासारख्या बलाढ्य राजाशी लढण्यास त्याचे सैनिक तयार नव्हते. मगधच्या साम्राज्याचे सैनिकी बळ व ताकद पाहून त्यांना भीती वाटली व त्यामुळे अलेक्झांडरला परतावे लागले.

अलेक्झांडरला आपल्या सैनिकांपुढे नमते घ्यावे लागले व तो भारतातून परतला. त्यानंतर त्याच्या भारतातील प्रदेशांमध्ये बंडाळ्या होण्यास सुरुवात झाली. एवढेच नव्हे तर, त्याला परतत असताना भारतीय लोकांच्या हल्ल्यांनादेखील तोंड द्यावे लागले. कंदहार प्रांतामध्ये भारतीय व्यक्तीच्या नेतृत्वाखाली बंड झाले. इसवी सन पूर्व ३२५ मध्ये उत्तरेकडील सिंधु नदीच्या खोऱ्यात (valley) च्या फिलीप्पस ह्या ग्रीक प्रमुखाची हत्या झाली. इसवी सन पूर्व ३२३ मध्ये स्वतः अलेक्झांडरचा मृत्यू झाला. चंद्रगुप्ताने ह्या सर्व गोष्टींचा फायदा उचलला. त्याने येथील भारतीयांना एकत्र करून त्यांचे नेतृत्व केले व ग्रीकांवर हल्ले करून त्यांचे भारतातील साम्राज्य संपविण्याचा जणू काही विडाच उचलला. इतिहासकारांच्या मते इसवी सन पूर्व ३१७ पर्यंत चंद्रगुप्त पंजाब व सिंध ह्या प्रांतांचा स्वामी बनला होता.

वायव्य भारतातील देदिप्यमान यशानंतर चंद्रगुप्ताने आपला मोर्चा मगधच्या साम्राज्याकडे वळवला. सुरुवातीस त्याला धनानंदच्या सैन्याचा पराभव करणे कठीण गेले व अनेकदा माघार घ्यावी लागली अशी माहिती आपणास मिळते. बौद्ध व जैन साहित्यात चंद्रगुप्ताने मगध जिंकण्यासाठी केलेल्या हल्ल्यांमधील चुका दर्शविलेल्या आढळतात. असे म्हटले जाते की, चंद्रगुप्त एकापाठोपाठ एक लढाया जिंकत गेला व तो पाटलीपुत्र ह्या राजधानीकडे कूच करत राहीला. मात्र, असे करत असताना त्याने जिंकलेल्या प्रदेशांचे शत्रूपासून रक्षण करण्याची व्यवस्था केली नाही. त्यामुळे तो लढाया जिंकून पुढे सरकत होता व त्याच्या पाठीमागे त्याने जिंकलेल्या प्रदेशांवर त्याच्या नकळत शत्रूचे हल्ले होत होते व ह्या प्रदेशांवर शत्रू धुमाकूळ घालत होता. अशावेळी, चंद्रगुप्ताला आपली चूक उमगली व त्याने ही चूक पुन्हा करण्याचे टाळले. त्यानंतर चंद्रगुप्ताने पाटलीपुत्र ह्या मगधच्या राजधानीवर हल्ला चढवला व धनानंदची हत्या केली. काही ग्रंथांतून आपणास धनानंदचा पाडाव करण्यात चाणक्य ऊर्फ कौटिल्याचा मोठा वाटा होता अशी माहिती मिळते. मात्र, आपण असे म्हणण्यास हरकत नाही की, ह्या यशात चंद्रगुप्त व चाणक्य ह्या दोहोंच्या भूमिका महत्त्वाच्या होत्या. चाणक्याची दूरदृष्टी, चाणाक्षपणा व विद्वता आणि चंद्रगुप्ताचे शौर्य ह्या गोष्टींच्या बळावर धनानंद सारख्या शक्तीवान राजाचा पराभव करणे शक्य झाले असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

चंद्रगुप्ताने नंद कुळाचा नाश केल्यानंतर मगधचे साम्राज्य तर मजबूत केलेच मात्र साम्राज्य विस्तार देखील मोठ्या प्रमाणात केला. चंद्रगुप्ताने मगधची सत्ता ताब्यात

---

योग्य वेळी धाडस अंगी संचारत नसल्याने भीतीमुळे निम्म्याहून अधिक लोक आपल्या कार्यात कायम अपयशी ठरतात.

घेतल्यानंतर तो मगधची राजकीय घडी व्यवस्थीत बसविण्यात व्यस्त असताना पुन्हा एकदा वायव्य भारतावर परकीय आक्रमण झाले. ह्यावेळी सेल्युकस निकोटार हा ग्रीक राजा आक्रमणकर्त्याच्या रुपात आला होता. सेल्युकस निकोटार ह्याने अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर त्याच्या पूर्वेकडील साम्राज्याचा बराचसा भाग ताब्यात घेतला होता व स्वतःस त्या प्रदेशाचा स्वामी म्हणून घोषीत केले होते. इसवी सन पूर्व ३०५ च्या आसपास सेल्युकस सिंधु नदीपर्यंत येऊन पोहोचला होता. ह्यावेळी मात्र, परकीयांची गाठ चंद्रगुप्तासारख्या ताकदवान सम्राटाशी पडणार होती. ग्रीक लेखक जरी सेल्युकस व चंद्रगुप्त यांच्यात झालेल्या लढाईचे विस्तृत वर्णन व माहिती देत नसले तरी सेल्युकसने कशाप्रकारे चंद्रगुप्ताला अनेक प्रदेश व इतर फायदे देऊन त्याच्यासोबत शांती प्रस्थापित केली ह्याची इत्यंभूत माहिती देतात. असे म्हटले जाते की, सेल्युकसने आरिया (Aria), आराचोसिया (Arachosia) व पॅरोपानीसादे (Paropanisadae) हे प्रदेश चंद्रगुप्ताला देऊन आपली त्याच्या तडाख्यातून सुटका करून घेतली. हे सर्व प्रदेश सध्याच्या मध्य आशियातील अफगाणिस्तान ह्या देशात होते. आरियाची राजधानी म्हणजे सध्याचे पश्चिम अफगाणिस्तानातील हेरात (Herat) हे शहर होय. आराचोसियाची राजधानी दक्षिण अफगाणिस्तानातील सध्याचे कंदहार (Kandahar) हे शहर तर पॅरोपानीसादे ह्या प्रांताची राजधानी सध्याचे अफगाणिस्तानातील काबुल हे शहर होय. काबुल ही अफगाणिस्तानची राजधानी देखील आहे. ह्या प्रांतांसोबतच सेल्युकसने चंद्रगुप्ताला आताचा पश्चिम पाकिस्तानातील बलुचिस्तान व तेव्हाचा गेदरोशिया (Gedrosia) हा प्रांतदेखील दिला असावा असे काही अभ्यासकांचे मत आहे. चंद्रगुप्ताने देखील सेल्युकसचा योग्य तो मान राखून आपल्या अस्सल भारतीय परंपरेप्रमाणे त्याला ५०० हत्ती भेट म्हणून दिले. सेल्युकस व चंद्रगुप्ताचे चांगले संबंध प्रस्थापित होण्यास अजून एक महत्वाची घटना कारणीभूत होती. ही घटना म्हणजे ह्या दोन राजांच्या घराण्यांत प्रस्थापित झालेले विवाहसंबंध हे होय. सेल्युकसने आपल्या मुलीचा विवाह चंद्रगुप्ताशी लावून दिला असे काही अभ्यासक मानतात. एवढेच नव्हे, तर सेल्युकसने आपला मेगास्थनीस (Megasthenes) नामक एक राजदूत चंद्रगुप्ताच्या दरबारात ठेवला व ग्रीक व मौर्य ह्यांचे संबंध सौर्दाहाचे राहतील याची दक्षता घेतली. ह्या मेगास्थनीसने त्याकाळात घडणाऱ्या विविध घटनांची माहिती वा नोंद लेखी स्वरूपात ठेवलेली आढळते. त्याच्या ह्या लिखाणातून तयार झालेल्या ग्रंथालाच 'इंडिका' (Indica) या नावाने ओळखले जाते. दुर्दैवाने काळाच्या ओघात ह्या ग्रंथातील अनेक नोंदी व पाने गहाळ झालेली आहेत. मात्र, जेवढी काही पाने उपलब्ध आहेत त्या आधारे देखील आपल्याला त्या काळातील भरपूर माहिती मिळते. हा अनमोल ऐतिहासिक ठेवा आपल्यासाठी ठेवल्यामुळे आपण भारतीयांनी मेगास्थनीसचे शतशः आभार मानले पाहिजेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

प्लुटार्क (Plutarch) व जस्टीन (Justin) सारखे लेखक चंद्रगुप्ताचा उल्लेख प्रबळ योद्धा व राजा असा करतात. प्लुटार्क तर चंद्रगुप्ताने सहा लाखाचे सैनिक असलेल्या सैन्याच्या जोरावर संपूर्ण भारत काबीज केला असे म्हणतो. चंद्रगुप्ताचे साम्राज्य उत्तरेत व वायव्येत पर्शियाच्या म्हणजेच सध्याच्या इराणच्या सीमेपर्यंत तर दक्षिणेत सध्याच्या कर्नाटकातील म्हैसूर ह्या प्रदेशाच्या देखील पलीकडच्या प्रदेशांपर्यंत पसरलेले होते. काही तामीळ कवींच्या कवितांमध्ये देखील चंद्रगुप्ताच्या सैन्याच्या दक्षिणेकडील आगमनाची, ते कोईंबतूर (Coimbatore) सारख्या प्रदेशातून पुढे गेल्याची, इत्यादी वर्णने येतात. यावरून चंद्रगुप्ताच्या साम्राज्याच्या विशालतेची कल्पना येते. ह्या बहुतांश प्रदेशांमध्ये चंद्रगुप्ताचा नातू अशोक ह्याचे शिलालेख, स्तंभलेख व इतर स्वरूपातील कोरीव लेख सापडतात. त्यामुळे देखील चंद्रगुप्ताच्या साम्राज्याची विशालता सिद्ध होते. चंद्रगुप्त मौर्य व त्याच्या पश्चात मगधच्या गादीवर आलेला

त्याचा नातू अशोकाच्या काळातही मौर्य साम्राज्याची प्रशासकीय घडी वा व्यवस्था अतिशय सुरेख होती व राजाला राज्य करण्यास त्या व्यवस्थेचा छान उपयोग होत होता असे जाणवते. ह्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे राजाच्या एकंदरीतच व्यक्तिमत्त्वावर व राज्यकारभारावर आचार्य चाणक्य ऊर्फ कौटिल्य वा विष्णुगुप्त ह्या विद्वानाची असलेली छाप हे होय. कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ह्या ग्रंथात राज्यकारभाराविषयीचे चांगले विवेचन केलेले आढळते. भारतीय संस्कृतीनुसार राजाने धर्माचे पालन करावे व दुष्टांना दंड करून चांगल्या व्यक्तींचा सन्मान करावा या उक्तीप्रमाणे चंद्रगुप्ताचे राज्य चालले होते.

प्रशासनाच्या दृष्टीने मौर्य साम्राज्याचे विभाजन अनेक प्रांतांमध्ये केलेले होते. ह्या प्रत्येक प्रांताचा कारभार पाहण्यासाठी एका प्रांत प्रमुखाची नियुक्ती केली जात असे. प्रांत प्रमुखाला आपल्या रोजच्या प्रशासकीय कारभारात मदत करण्यासाठी एक 'मंत्रीपरिषद' असे. त्याप्रमाणे विविध विभागांच्या प्रमुखांना 'अध्यक्ष' म्हणून संबोधले जात असे. अनेकदा प्रांत प्रमुख म्हणून राजघराण्यातील व्यक्तींची व राजकुमारांची नियुक्ती केली जात असे. यामागचे कारण म्हणजे प्रांतामध्ये राजा विरुद्ध बंडाळी होऊ नये हे असावे. अशाप्रकारे, मौर्य काळात साम्राज्याचे प्रशासकीय विभाजन राजघराण्यातील व्यक्ती प्रांत प्रमुख असलेले प्रांत व राजघराण्याच्या बाहेरील असलेली व्यक्ती प्रांत प्रमुख असणारे प्रांत अशा दोन प्रकारांमध्ये झालेली आढळते.

राजाने योग्य ते शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले असावे असे अपेक्षित होते. चंद्रगुप्त मौर्याला आचार्य चाणक्यांसारख्या विद्वानाच्या सानिध्यात राहून प्रशिक्षण घेण्याचे भाग्य लाभले. त्यामुळे चंद्रगुप्त मौर्य हा एक चांगला प्रशिक्षित राजा होता. राजाने संख्याशास्त्राचा अभ्यास करणे, लिखाणाचा सराव करणे, वेदांचा अभ्यास करणे, भारतीय तत्त्वज्ञान अभ्यासणे, राज्यशास्त्राविषयी तज्ज्ञ मंडळींकडून ज्ञान मिळविणे, सैनिकी प्रशिक्षण घेणे; पुराण, रामायण, महाभारत तसेच धर्मशास्त्रांचा अभ्यास व वाचन करणे अपेक्षित होते. त्याचप्रमाणे त्याने आयुष्यभर विद्यार्थी राहून फावल्या वेळात देखील ज्ञान मिळविण्याचा व मिळविलेले ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा असे देखील अपेक्षित होते.

राजाचे रोजचे वेळापत्रक बनविण्याची अभिनव पद्धत देखील मौर्यांच्या काळात अस्तित्वात होती. हे वेळापत्रक राजाला प्रत्येक दिवशी प्रशासकीय कामाचा किती प्रमाणात ताण आहे यावरून ठरत असे. दिवस व रात्रीचे प्रत्येकी आठ प्रहरांमध्ये म्हणजेच चोविस तासांचे एकूण सोळा प्रहरांमध्ये विभाजन केले जात असे. राजाचा दिवस सकाळी दीड वाजता सुरू होत असे व राजा फक्त रात्री साडे दहा ते सकाळी दीड वाजेपर्यंतच म्हणजे फक्त तीन तासच झोप घेत होते असे अशी माहिती आपणास मिळते. ह्या वेळापत्रकांची सुक्ष्म फोड देखील आपणास मिळते. ही फोड वा विभाजन खालीलप्रमाणे आहे.

• सकाळी दीड ते तीन – झोपेतून उठणे (राजाला झोपेतून उठविण्यासाठी विविध वाद्यांतून संगीत वाजविले जात असे)

• पहाटे तीन ते साडे चार – विविध योजना व नीतींची निश्चिती करणे.

• पहाटे साडे चार ते सकाळी सहा वाजेपर्यंत – पुरोहित, वैद्य, भटारखान्यातील कर्मचारी, ज्योतिषी इत्यादींसोबत हितगुज करणे.

• सकाळी सहा ते साडे सात – दरबारात उपस्थित राहणे व सैनिकी व वित्त अधिकाऱ्यांच्या अहवालावर चर्चा करणे.

• सकाळी साडे सात ते नऊ – पुन्हा राज्य दरबारात उपस्थिती व सामान्य नागरिकांच्या समस्यांचे निवारण करणे.

• सकाळी नऊ ते साडे दहा – आंघोळ व जेवण करणे तसेच धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करणे.

• सकाळी साडे–दहा ते दुपार बारा – विविध विभागांच्या प्रमुखांना भेटणे व त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या सांगणे.

नाती ही झाडाच्या पानासारखी असतात. एकदा तुटली की त्याची हिरवळ कायमची निघून जाते!

• दुपारी बारा ते दीड – मंत्रीमंडळासोबतचा पत्र व्यवहार पूर्ण करणे व गुप्तहेरांसोबत चर्चा करून गुप्तहेरगिरी बाबतच्या नवीन योजना बनविणे व निर्णय घेणे.

• दुपारी दीड ते तीन – थोडीशी विश्रांती व विरंगुळ्यात वेळ घालविणे. असे करताना राज्याच्या विविध धोरणांविषयी डोक्यात विचार करणे चालूच ठेवणे.

• दुपारी तीन ते साडे चार – सैन्याची व शस्त्रास्त्रांची पाहणी करणे.

• दुपारी साडे चार ते संध्याकाळ सहापर्यंत – सेनाप्रमुखासोबत (सेनापती सोबत) सैन्याबाबत चर्चा व संध्याकाळची प्रार्थना

• संध्याकाळ सहा ते साडेसात – गुप्तहेर व दुतांसोबत चर्चा

• संध्याकाळ साडेसात ते रात्री नऊ पर्यंत – दिवसातील दुसरी आंघोळ व धार्मिक चिंतन

• रात्री नऊ ते साडे दहा – संगीतांच्या सुरांसोबत विश्रांती घेणे.

• रात्री साडेदहा ते सकाळी (पहाटे) दीड पर्यंत – झोप घेणे.

अशा प्रकारे राजाचे वेळापत्रक पूर्णपणे व्यस्त होते व त्याला फक्त तीन तासांचीच निद्रा वा झोप मिळत असे. त्यामुळे राजा म्हणजे फक्त शाही सुखात लोळणे ही संकल्पना मौर्य काळात नव्हती. याउलट अगोदर नमूद केल्याप्रमाणे राजाने आपल्या राजधर्माचे पालन करावे व त्याप्रमाणे राज्यकारभार करावा असे अपेक्षित होते. कौटिल्यांच्या अर्थशास्त्रात म्हटले आहे की, प्रजेची सतत सेवा करणे हे राजाचे व्रत, प्रशासकीय काम करणे हे धार्मिक कार्य व त्याने दिलेली सर्वोच्च दक्षिणा वा दान म्हणजे सर्वांना दिलेली समान वागणूक हे होय. ह्यावरूनच मौर्य काळात भारतीय संस्कृती व हिंदू धर्माच्या चांगल्या परंपरांचा व तत्त्वांचा किती प्रभाव होता हे जाणवते. मेगास्थनीस ह्या ग्रीक प्रतिनिधीने देखील चंद्रगुप्त मौर्याचे राजा म्हणून वेळापत्रक खूपच व्यस्त होते ह्याची पुस्ती केली आहे. तो म्हणतो चंद्रगुप्त पूर्ण दिवस व्यस्त तर राहातच असे मात्र दरबाराची वेळ संपण्याच्या वेळी देखील एखादी गरजू व्यक्ती आली तर चंद्रगुप्त अशा अभ्यागतांना भेटत असे. त्याचप्रमाणे राजदरबाराची कवाडे सर्वांसाठी समानपणे उघडी होती व कोणतीही व्यक्ती राजाला भेटू शकत होती व न्याय मागू शकत होती.

राजाच्या संरक्षणार्थ अनेकदा स्त्री–सैनिक असत अशी माहिती आपणास मिळते. ह्यापैकी काही सैनिक स्त्रिया रथात तर काहीजणी घोड्यावर व हत्तीवर बसलेल्या असत व राजाच्या बाजूला कोंडाळे करत वा वर्तुळाकार स्थितीत चालत असत व मध्यभागी राजा असे. राजाची सेवा करण्यासाठी प्रामुख्याने स्त्री सेविकांची नियुक्ती केली जात असे व त्यांनी राजाला आंघोळ घालणे, मालीश करणे, त्याचे अंथरूण करणे, कपडे धुणे, राजाला राजदरबारात जाण्यासाठी दागिने घालून सजविणे, राजावर राजछत्र धरणे, राजाला हात–पंख्याच्या सहाय्याने वारा घालणे, भटारखान्यात काम करणे इत्यादी कामे करणे अपेक्षित होते. राजा विरंगुळ्यासाठी शिकारीस जात असे. तसेच शर्यतींचे आयोजन व प्राण्यांच्या झुंजी देखील लावल्या जात असत. शिकारीसाठी जाताना राजा सोबत शिकारी कुत्रे घेऊन जात असे व सिंह तसेच वाघाची देखील शिकार करत असे. चंद्रगुप्ताच्या काळात शर्यतींसाठी विशेष व बलाढ्य जातीच्या बैलांची पैदास केली जात असे. त्याचप्रमाणे शर्यतीच्या गाड्यांना दोन बैल व मध्ये एक घोडा जुंपला जात असे अशी रोचक माहिती मिळते.

चंद्रगुप्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहसा पालखीतून जात असे. ही पालखी सोन्याची असे व त्याचे सोबती रस्त्यातून जात असताना सुगंधीत द्रव्य शिंपडत असत.

राजाच्या वाढदिवसाच्या दिवशी समारंभपूर्वक त्याला आंघोळ घालून त्याचे केस धुतले जात व लोक राजाला भेटवस्तू देत असत. राजाला हरीण, गेंडा, कबूतर, बदक,

हंस इत्यादी पक्षी, वाघ, बिबट्या, याक, शिकारी कुत्रे इत्यादी प्राणीदेखील भेट म्हणून दिले जात.

राजाचा निवास मोठ्या राजवाड्यांमध्ये असे व हे राजवाडे अनेकदा मोठ्या बागांच्या मध्यभागी बांधलेले असत वा राजवाड्यांच्या आजूबाजूला बाग पसरलेली असे. ह्या बागांमध्ये विविध पक्षी, मोर व अनेक प्रकारची झाडे वा वृक्ष असत. राजवाड्याचे संरक्षण करण्यासाठी राजवाड्याच्या भोवती उंच भिंती उभारल्या जात व राजवाड्यामध्ये राजा व राजघराण्यातील व्यक्तींच्या निवासाची विविध दालने असत. त्याचप्रमाणे राजाचा वारस ज्यास युवराज वा कुमार म्हटले जात असे यांची दालने, मंत्र्यांची दालने, दरबार भरविण्यासाठीचे सभागृह, विविध विभागांच्या अध्यक्षांची दालने इत्यादी अनेक दालने असत. राजासाठी शयनगृह, वेशभूषा व केशभूषेसाठी दालन, त्याच्या अंगरक्षकांचे दालन इत्यादी दालने असत. त्याचप्रमाणे राजाची केशभूषा, त्याला सजविणे, त्याचे भोजन बनविणे, मनोरंजन करणे इत्यादीसाठी सेवक व सेविका असत. राजाच्या रक्षणासाठी विशेष काळजी घेतली जात असे. प्रामुख्याने आग, विषारी प्राणी व विषप्रयोग यापासून राजाचे रक्षण करण्यासाठी विशेष काळजी घेतली जात असे. साप चढू शकणार नाही अशा प्रकारची झाडे राजवाड्याच्या आसपास लावली जात असत. पोपट पाळले जात कारण ते साप दिसल्यावर आरडाओरड करत. त्यामुळे सेवकांना साप निघाला आहे हे कळत असे. त्याचप्रमाणे राजाला जेवणातून विष प्रयोग होऊ नये म्हणून त्याचे जेवण विविध लोकांना चाखण्यासाठी दिले जात असे व त्यानंतरच ते राजाला वाढले जात असे.

त्याकाळच्या रीतीप्रमाणे राजानंतर त्याचा ज्येष्ठ मुलगा वा ज्येष्ठ राजकुमार हा राजा बनावा असा दंडक होता. चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा बिंदुसार हा मगध सम्राट बनला. त्याने चंद्रगुप्ताने उभारलेले विशाल साम्राज्य व्यवस्थितपणे सांभाळलेले आढळते. याचे कारण म्हणजे त्याच्या काळात मौर्यांचे साम्राज्य सुरक्षित होते असे आढळते. बिंदुसारानंतर त्याचा मुलगा अशोक हा मौर्य सम्राट बनला. अशोकाला 'चंडाशोक' म्हणून देखील संबोधले जाते. चंद्रगुप्ताप्रमाणे अशोक हा देखील मौर्य कुलातील खूप प्रसिद्ध सम्राट होय व ह्यानेच खऱ्या अर्थाने बौद्ध धर्माचा भारताबाहेर प्रसार करून बौद्ध धर्माला वैश्विक धर्म बनविण्याचे काम केले. अशोकाने भारतीयांवर केलेले सर्वात मोठे उपकार म्हणजे त्याने भारताच्या विविध भागांत उभारलेले वा कोरलेले शिलालेख व स्तंभलेख हे होत. ह्या शिलालेखांवरून मौर्यांच्या साम्राज्याची व्याप्ती तर कळतेच मात्र त्याच सोबत तत्कालीन भारतीय राज्य व्यवस्था, राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक इत्यादी स्थितींबाबतदेखील विस्तृत माहिती मिळते.

चंद्रगुप्ताच्या व एकंदरीतच अशोक ह्या सम्राटाच्या कारकिर्दीपर्यंत मौर्यांच्या काळात राज्यात सुबत्ता, समृद्धी व आर्थिक भरभराट असलेली जाणवते. त्याचप्रमाणे व्यापार-उदीमास चालना दिलेली आढळते.

वरील सर्व विवेचन पाहिल्यावर चंद्रगुप्त मौर्याचा काळ म्हणजे भारतीय इतिहासातील एक उत्कृष्ट काळ होता असे म्हणणे संयुक्तीक ठरते. अर्थात, एवढी उंच प्रतीची राज्यव्यवस्था निर्माण करण्यासाठी चंद्रगुप्ताला आचार्य चाणक्यांची खूपच मदत झाली यात वादच नाही. नव्हे, ह्या सर्वात चंद्रगुप्ताबरोबरच आचार्य चाणक्यांचा देखील सिंहाचा वाटा होता. अशा ह्या राजाचा बराच काळ सैनिकी मोहिमा व साम्राज्य विस्तारात गेल्याचे इतिहासकारांचे मत आहे.

जैन धर्म-ग्रंथांतून आपणास माहिती मिळते की, चंद्रगुप्ताने नंतरच्या काळात जैन धर्माची दीक्षा घेतली. इसवी सन पूर्व ६ व्या शतकात भारतामध्ये व प्रामुख्याने उत्तरपूर्व म्हणजेच सध्याचा पूर्व उत्तरप्रदेश व बिहार ह्या प्रदेशांमध्ये बौद्ध व जैन ह्या दोन नवीन धर्मांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. महात्मा गौतम बुद्धाने बौद्ध

धर्माची तर महात्मा महावीर जैन (जैनांचा चोवीसावा व शेवटचा तीर्थंकर) ह्यांनी अनुक्रमे बौद्ध धर्माची स्थापना करण्याचे व जैन धर्म प्रबळ करण्याचे काम केले. इसवी सन पूर्व ६वे शतक व त्यानंतरच्या काळात देखील बौद्ध व जैन धर्माला अनेक राजांनी राजाश्रय दिला व तो स्वतः स्विकारला देखील. अशाप्रकारे इसवी सन पूर्व ३ऱ्या शतकात चंद्रगुप्ताने जैन धर्म स्विकारल्याची माहिती मिळते. एवढेच नव्हे तर कौटुंबिक जीवनातून संन्यास घेतला व तो भद्रभाऊ ह्या जैन भिक्षूच्या नेतृत्वाखाली जैन धर्माच्या इतर अनेक भाविकांसोबत दक्षिणेकडे म्हैसूर (कर्नाटक) येथे गेला. म्हैसूरमध्ये हे सर्व लोक 'श्रवणबेळगोळा' ह्या ठिकाणी गेले. येथे काही कोरीव लेख आढळलेले आहेत व त्यात चंद्रगुप्त व भद्रभाऊ हे दोघे कसे संतांप्रमाणे जीवन व्यतीत करत होते याची माहिती मिळते. श्रवणबेळगोळ्याला चंद्रगुप्त ज्या टेकडीवर राहात होता त्या टेकडीला 'चंद्रगिरी' म्हणून संबोधले जाते व येथील मंदिरास 'चंद्रगुप्तबस्ती' असे म्हटले जाते. जैन धर्मामध्ये उपवास करत करत हळूहळू अन्न ग्रहण कमी करून देहत्याग करण्याची प्रथा होती. ह्या प्रथेप्रमाणे चंद्रगुप्त मौर्याने प्राणत्याग केल्याची माहिती आपणास मिळते.

चंद्रगुप्त मौर्य हा भारतीय इतिहासातील एक महान सम्राट होता यात काहीच वाद नाही. खऱ्या अर्थाने भारतीय उपखंडाचे पहिल्यांदा एकीकरण करण्याचे श्रेय चंद्रगुप्ताला जाते. तेव्हापासूनच अखंड भारताची संकल्पना भारतीयांच्या मनात खोलवर रुजली असे म्हणणे वावगे वा अतिशयोक्ती ठरणार नाही. वाचकांना एक सांगावेसे वाटते की, आचार्य चाणक्य व चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीवर एका सुरेख दूरदर्शन मालिकेचे निर्माण डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी यांनी केले आहे. ही मालिका १९९० च्या दशकात दूरदर्शनवर दाखविली जात असे. ह्या मालिकेचे सुरेख दिग्दर्शन देखील डॉ. चंद्रप्रकाश ह्यांनीच केलेले असून आचार्य चाणक्यांची भूमिका देखील त्यांनी स्वतः केलेली आहे. ही मालिका 'सीडी' वा 'डीव्हीडी'च्या स्वरूपात देखील उपलब्ध असण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीत अशा मालिका आपल्या मुलांच्या मनावर चांगले संस्कार रुजविण्याच्या दृष्टीने दाखविण्याची गरज आहे असे लेखकाचे वैयक्तिक मत आहे.

भारताला सुरुवातीला नमूद केल्याप्रमाणे फार मोठा सांस्कृतिक व ऐतिहासिक वारसा आहे व त्याचे जतन करण्याची नैतिक जबाबदारी आपली आहे. आपल्या इतिहासाचे काळजीपूर्वक वाचन करून त्यातील चांगल्या गोष्टींपासून प्रेरणा घेऊन आपले वर्तमान व भविष्य उज्ज्वल बनविण्याचे कार्य आपण केले पाहिजे. ह्या कार्यात चंद्रगुप्त मौर्याचे व आचार्य चाणक्यांचे योगदान नेहमीच प्रेरणादायी राहील यात काहीच वाद नाही.

**टीप : लेखात 'शुद्र, न्हावी' इत्यादी शब्द आले आहेत. ह्या शब्दांचा वापर तत्कालीन परिस्थितीनुरूप घटना समजण्यासाठी व तसा उल्लेख ऐतिहासिक साधनांमध्येच आल्यामुळे ह्या लेखात करण्यात आला आहे. यातून वाचकांनी कृपया दुसरा कुठलाही विपरीत अर्थ काढू नये.**

**संदर्भ :**


- चंद्रगुप्त मौर्य अँड हिज् टाइम्स् : राधा कुमुद मुखर्जी
- द हिस्ट्री अँड कल्चर ऑफ द इंडियन पीपल–द एज ऑफ इंम्पीरिअल युनिटी : प्रमुख संपादक– आर.सी. मजूमदार, सहाय्यक संपादक – ए. डी. पुसाळकर, ए. के. मजूमदार
- ॲन ॲडव्हान्स्ड हिस्ट्री ऑफ इंडिया (खंड–२) : आर. सी. मजूमदार, एच्. सी. रेचौधरी
- अर्ली हिस्ट्री ऑफ इंडिया : रोमीला थापर


**– सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी–बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

# ऑक्सफर्ड - केंब्रीज आणि बरंच काही

*ऑक्सफर्ड-केंब्रीज येथील विद्यापीठातील शिक्षण पद्धतीचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे - संपादक*

जागतिक पातळीवर एकूणच शिक्षण व्यवस्थेत ऑक्सफर्ड आणि केंब्रीज विद्यापीठाचं स्थान गेल्या कित्येक शतकांपासून अबाधित आहे. विद्यापीठीय शिक्षण म्हणजे केवळ पदवीधर विद्यार्थी तयार करण्याचा कारखाना नसून खऱ्या अर्थाने सुजाण आणि सुबुद्ध नागरिक घडवण्याचा प्रपंच आहे आणि असे ग्लोबल नागरिक घडवण्याचं काम या विद्यापीठांकडून अव्याहतपणे चालू आहे.

भारतीय आणि ब्रिटिश शिक्षणपद्धतीची तुलना केल्यास ब्रिटिश पद्धत अथवा तेथील विद्यापीठीय शिक्षण हे अत्यंत अव्वल दर्जाचे आणि आपल्याकडील शिक्षण हे कमअस्सल आणि कामचलाऊ आहे असा सरसकट गैरसमज आपल्याकडील पालक-विद्यार्थी आणि शिक्षक वर्गात असल्याचे आढळून येते. भारतामधील आधुनिक व्यवस्थापन संस्था आणि नवीन विद्यापीठे ऑक्सफर्ड आणि केंब्रीजसारख्या विद्यापीठांना आदर्श, रोल मॉडेल मानून त्यानुसार त्यांचा शिक्षणक्रम आणि इतर शैक्षणिक धोरणांची आखणी करताना दिसतात आणि अर्थातच अशा प्रकारचे दिसून येते. परंतु मुळामध्ये आपल्या शिक्षणसंस्थांना हे असे करण्याची वेळ का यावी? असे करण्यासाठी कोणते घटक कारणीभूत ठरतात? याचा सांगोपांग विचार करण्याची गरज आहे. हा सारासार विचार करून या दोन्ही शिक्षण पद्धतींचा तौलनिक विचार करण्याची संधी या उन्हाळ्याच्या लंडन भेटीमुळे मिळाली आणि त्या भेटीचा शैक्षणिक दृष्टीने केलेला ऊहापोह असे या प्रस्तुत लेखाचे स्वरूप आहे.

ब्रिटिश विद्यापीठांचे अनुकरण करताना सर्वप्रथम आपण आपल्या प्राचीन गुरुकुल शिक्षण पद्धतीला पूर्णपणे विसरून जात आहोत व आधुनिक शिक्षण हे अधिकाधिक सूक्ष्म व तांत्रिक बनवत आहोत अशी खंत वाटल्यावाचून राहात नाही. ब्रिटिश वसाहतकाळापूर्वी भारतीय शिक्षण हे मुक्त, सर्वव्यापी आणि सर्वांगीण अशा प्रकारचे निसर्गकेंद्रित शिक्षण होते. निसर्ग हीच शाळा आणि त्या शाळेत भाषा, संगीत, विज्ञान आणि समाज या सगळ्यांचा अभ्यास होत असे. स्वातंत्र्यपूर्वकाळात लॉर्ड मेकॉले या ब्रिटिश अधिकाऱ्याने 'जन्माने भारतीय परंतु चारित्र्य व वर्तनाने ब्रिटिश' अशा ब्रिटिशानुवर्ती चाकरमान्यांची निर्मिती करण्यासाठी निसर्गस्वान्निध्यातली मुक्त शाळा चार भिंतींच्या आत बंदिस्त केली आणि या बंदिस्त शाळेत तणावाखाली व इंग्रजी भाषेच्या भीतीने ग्रस्त अशा प्रकारचे विचित्र शिक्षण देण्यास सुरुवात झाली जी आजतागायत सुरू आहे. आजही आपण त्याच मेकॉले प्रणित पद्धतीचा वापर करून संपूर्ण भारतभरात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण देत आहोत आणि तिसऱ्या स्तरावरील विद्यापीठीय, पदवीचे शिक्षणदेखील अशाच प्रकारच्या प्रभावाखालील आहे. त्यामुळे शिक्षणातील अस्सल भारतीय आज हा हरवून चालला आहे. 'त्यांचं ते चांगलं आणि आपलं ते वाईट' अशा धारणेचा नव उच्च मध्यमवर्ग आज भारतात जागतिकीकरणानंतर उदयाला आल्याचे दिसत आहे. काय आहे यामागचे कारण? काय गमक आहे ब्रिटिश शिक्षणपद्धतीचे?

ऑक्सफर्डसारख्या जगमान्य विद्यापीठाचे शिक्षण हे अत्यंत मुलभूत अशा चतुःसूत्रीवर आधारित आहे. (Quadrivium) यामध्ये भाषा-साहित्य, तर्कशास्त्र, मुलभूत विज्ञान आणि संगीत या सर्वांचा समावेश होतो. या चारांपैकी एकाचे अध्ययन राहून गेले तरी मानव-विकास अर्धवट आहे. म्हणून एकूणच शिक्षणक्रमाची

आखणी करताना या मुलभूत विद्याशाखांचे शिक्षण प्राधान्याने दिले जाते आणि हा पाया पक्का झाल्यावर त्यात विशेषीकरण (Specialization) करता येते.

ऑक्सफर्डसारख्या अध्ययावत परंतु तरीही प्राचीन अशा विद्यापीठात आजही मानवशाखांचा (Humanities) अभ्यास हा केंद्रस्थानी आहे. या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये मानवविद्याशाखा या प्रामुख्याने शिकवल्या जातात व सर्व महाविद्यालयांचे व एक केंद्रीय परीक्षा मंडळ पदवीपरीक्षांचे व्यवस्थापन करते.

आता थोडेसे केंब्रीज विषयी. १२०९ साली सुरू झालेले हे विद्यापीठ म्हणजे मुलभूत विज्ञानाच्या अध्ययन-अध्यापनाचे माहेरघर. विज्ञानातील सर्वाधिक नोबेल पारितोषिक विजेते हे केंब्रीज विद्यापीठातील आहेत. सर आयझॅक न्यूटन, स्टीफन हॉकिंग, श्रीनिवास रामानुजन असे दिग्गज शास्त्रज्ञ म्हणजे केंब्रीज विद्यापीठाची देणगी होय. केंब्रीज विद्यापीठातदेखील अत्यंत उत्तम दर्जाचे विज्ञानाचे शिक्षण देणारी ट्रिनीटी, किंग्ज, क्वीन्स कॉलेज अशी उत्तमोत्तम महाविद्यालये आहेत. आपल्याकडील डॉ. जयंत नारळीकर यांचे शिक्षण देखील केंब्रीजमधल्या किंग्ज कॉलेजम येथे झालेले आहे. केंब्रीज विद्यापीठामध्ये विद्यार्थीसंख्येपेक्षा गुणवत्तेला प्राधान्य दिले जाते. विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यासाठी एक मार्गदर्शक (Mentor) आणि एक निरीक्षक (Supervisor), समुपदेशक असतो. महाविद्यालयीन लक्चर्ससाठीची उपस्थिती ऐच्छिक असली तरी दुपारच्या वेळी असणाऱ्या समुपदेशकाच्या बैठकीला हजर राहाणे हे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असते. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाची खबरदारी घेतली जाते. तेथील पदवीपरीक्षा म्हणजे विद्याार्थ्यांच्या केवळ लेखनकौशल्याची चाचणी नसून त्या विद्यार्थ्याची संशोधन क्षमता, सादरीकरण कौशल्य व विचारांतील अस्सलपणा याची परीक्षा असते. या अशा प्रकारच्या परीक्षा पद्धतीतून तयार होऊन बाहेर पडलेले विद्यार्थी भविष्यात मुलभूत विज्ञानात महत्त्वाची भर घालतात.

या पार्श्वभूमीवर पाहू गेल्यास भारतीय शिक्षण कुठे आहे? असा प्रश्न पडल्यावाचून राहात नाही. आजच भारतीय शिक्षणात शालांत परीक्षेनंतरच मुलभूत विज्ञान, सामाजिक शास्त्रे, भाषा-साहित्य या विद्याशाखांची फारकत केली जाते व एककल्ली, एकसुरी अशा प्रकारचे एकांगी शिक्षण पदव्युत्तर पातळीपर्यंत दिले जाते. त्यातही विद्यार्थ्यांच्या वैचारिक व विश्लेषणात्मक कौशल्यापेक्षा स्मरणशक्ती व लेखन कौशल्यावर भर दिला जातो. संशोधन व नवनिर्मितीक्षम उपक्रमांऐवजी लेखी परीक्षा व संदर्भ ग्रंथांची घोकंपट्टी याला जास्त महत्त्व आहे. अर्थातच यातून विद्यार्थ्यांच्या वैचारीक विकासापेक्षा अनुकरणवृत्ती वाढत राहाते आणि संशोधनाच्या क्षेत्रात आपण मागे पडतो. विद्यार्थीसंख्या हा प्रमुख निकष असल्याने वैयक्तिक मार्गदर्शन तर दूरच परंतु शिक्षकांना वर्गातील सर्व विद्यार्थ्यांशी एकत्र संवाद साधणे देखील अशक्य होऊन बसते. शिक्षणाच्या प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरदेखील अशा अनेक समस्या व प्रश्न आपल्याकडे आहेत. असे असले तरीही अजूनदेखील उत्तम शिक्षण देणाऱ्या अनेक शिक्षण संस्था व चांगले विद्यार्थी, शिक्षक आपल्या देशात आहेत. कमतरता आहे ती शिक्षणाच्या अस्सलपणाची. आधुनिक तरीही संपूर्ण भारतीय बाजाचे शिक्षण भारतीय भाषांमधून देणे अजूनही शक्य आहे. त्यासाठी प्रतिमानच (Model) हवे असेल तर टागोरांचे शांतिनिकेतन, जे. कृष्णमूर्तीची निसर्गशाळा अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. तीव्र इच्छाशक्ती आणि दूरदृष्टीच्या बळावर अस्सल भारतीय शिक्षण व्यवस्था उभी करणे हे शक्य आहे आणि असे शिक्षण देण्याची प्रेरणा या भेटीमुळे मिळाली हीच या ऑक्सफर्ड आणि केंब्रीज दौऱ्याची फलश्रुती म्हणावी लागेल.

**- अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी**
सेंट झेवियर्स महाविद्यालय,
मुंबई - १.

'मी' ऐवजी 'आपण' या शब्दाचा प्रयोग करा.

# परिसर वार्ता

– संकलित

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

शैक्षणिक वर्ष २०१५–१६ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे आहे –


पहिले दहा विद्यार्थी सन २०१६

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | भुरे कौस्तुभ संजय | ९६.०० | १ |
| २ | सातपुते शुभम विठ्ठल | ९५.८० | २ |
| ३ | जाधव ऋषीकेश भाऊ | ९५.६० | ३ |
| ४ | रावराणे श्रुती सुनील | ९५.२० | ४ |
| ५ | कोंडे वेदांत सुनील | ९५.२० | ४ |
| ६ | गोगावले तेजस रामदास | ९४.२० | ५ |
| ७ | जाधव आकाश किरण | ९४.०० | ६ |
| ८ | वडशिंगकर वेदश्री नंदकुमार | ९३.६० | ७ |
| ९ | निकम हतिक सतीश | ९३.६० | ७ |
| १० | शेडगे पायल रमेश | ९३.४० | ८ |
| ११ | सावंत अंकिता दिलीप | ९३.४० | ८ |
| १२ | अवघडे शुभम प्रवीण | ९२.८० | ९ |
| १३ | तुपकर अपूर्व विलास | ९१.६० | १० |

**RESULTS OF S.S.C. BOARD EXAMINATION : MARCH - 2016**

| SUMMARY | RESULT |
|---|---|
| No. of Students : | 282 |
| Students Appeared : | 282 |
| Passed : | 280 |
| Percentage : | 99.29% |

| Class | |
|---|---|
| Distinction | 110 |
| I Class | 123 |
| II Class | 46 |
| Pass Class | 1 |
| Fail | 2 |
| **Total** | **282** |




| Percentage | No. of Students |
|---|---|
| 90 & Above | 20 |
| 75 - 90 | 90 |
| 60 - 74 | 123 |
| 45 - 59 | 46 |
| 35 - 44 | 1 |
| Fail | 2 |

### Highest Grade

| Subject | Name | Marks |
|---|---|---|
| Marathi | Gogawale Tejas | 93 |
| | Adhakhale Prachi | 93 |
| | Adake Ninad | 93 |
| | Padwal Rutuja | 93 |
| Sanskrit | Gogawale Tejas | 99 |
| | Karnik Mihir | 99 |

मनुष्याजवळची नम्रता संपली की, त्याच्या जवळची माणूसकीच संपली म्हणून समजावे – वाल्मिकी.

| | | |
|---|---|---|
| | Konde Vedant | 99 |
| | Patil Prathmesh | 99 |
| | Phalke Pranali | 99 |
| | Patil Mansi | 99 |
| | Satpute Shubham | 99 |
| | Wadshingkar Vedshree | 99 |
| | Jadhav Rushikesh | 99 |
| English | Konde Vedant | 91 |
| Hindi | Shinde Shraddha | 89 |
| Science | Bhure Kaustubh | 98 |
| Maths | Bhure Kaustubh | 98 |
| | Jadhav Akash | 98 |
| | Shedge Payal | 98 |
| | Yadav Rushikesh | 98 |
| | Jadhav Rushikesh | 98 |
| | Ravrane Shruti | 98 |
| | Satpute Shubham | 98 |
| S. Science | Ravrane Shruti | 98 |

**१ जुलै २०१६ वृक्षारोपण अहवाल**



**१ जुलै कृषीदिनानिमित्त वृक्ष लागवड मोहिमेत सहभाग**

दि. १ जुलै हा कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. सन २०१६ या वर्षात २ कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र सरकारने राबविण्याचे ठरविले. या कामी सर्व संस्था सहभागी झाल्या. यात आमच्या विद्यालयातील इ. ७ वी, ८ वीच्या स्काऊट गाईड विद्यार्थ्यांनी शिक्षकांसवेत एकाच दिवशी विविध ठिकाणी वृक्षलागवड करून भूमातेबद्दलचे प्रेम दाखवून दिले. या दिवशी विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक मा. गढरी सर उपस्थित होते. ज्येष्ठ शिक्षक श्री. धोंडे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षाशी संबंधीत शपथ दिली. शाळेतील ९५ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. त्यांनी ९२ वृक्षांची विविध ठिकाणी लागवड केली. ती जोपासण्याचीही जबाबदारी त्यांनी घेतली. या प्रसंगी शाळेचे स्काऊट मास्तर प्रकाश पांचाळ, करमसिंग सोनावणे व गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**दि. १९ जुलै २०१६ गुरुपौर्णिमा**

दि. १९ जुलै २०१६ रोजी शाळेत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. गुरुपौर्णिमेनिमित्त सकाळ अधिवेशनात आपल्या शाळेतील निवृत्त शिक्षिका आशा जोशी यांना प्रमुख पाहुण्या म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेनिमित्त मार्गदर्शन केले. त्यातून चरित्र वाचनातून आपल्या जीवनावर कसा परिणाम होऊ शकतो व त्याचा आपण कसा योग्य फायदा करून घ्यावा याबद्दल मार्गदर्शन केले.



आपल्या विषयी वाईट बोलणारे बरेच लोक असतात. त्यांच्याकडे लक्ष द्याल तर विखुरले जाल;
आणि मन शांत ठेवून पुढे जाल तर नेहमी यशस्वी व्हाल!

दुपार अधिवेशनात झुनझुनवाला कॉलेज, घाटकोपर येथील निवृत्त अधिव्याख्यात्या व संस्कृत विभाग प्रमुख श्रीमती नीला कोर्डे यांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे या कार्यक्रमाला प्रातिनिधीक स्वरूपात इ. ८ वी अ च्या विद्यार्थ्यांना एका वर्गामध्ये बसवून तिथून प्रत्येक इयत्तेच्या वर्गांना आपापल्या वर्गात बसवून ध्वनीक्षेपकावरून कार्यक्रम सर्वांना ऐकता येईल अशी व्यवस्था केली होती. त्यामुळे इ.५वी ते ८ वी सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

सौ. साधना कारंडे-जोशी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाला मा. मुख्याध्यापक श्री. गढरी सर व ज्येष्ठ शिक्षिका सौ. वंदना अडसुळे उपस्थित होत्या. इतर सर्व शिक्षक प्रत्येक वर्गांमधून विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रमाचा आस्वाद घेत होते.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगताना 'पर्यावरणाला गुरू माना, विचारशक्ती गमावू नका' हा संदेश दिला.

**शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ची सुरुवात**

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ दि. १५/६/२०१६ पासून सुरू झाले. वर्षाच्या सुरूवातीलाच इ. ५वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना शासनातर्फे मोफत पाठ्यपुस्तके पुरवण्यात आली. त्याचे वाटप ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना केले.

**पालक-शिक्षक सभा दि. २ जुलै २०१६**

दि. २ जुलै २०१६ रोजी पालक-शिक्षक सभा घेऊन पालकसंघाची स्थापना करण्यात आली. त्यातून शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आली.

**६ जुलै २०१६ – काव्यतुषार**

शिवसेना संस्था, राजेंद्रनगर, बोरिवली (पूर्व) येथील ज्येष्ठ नागरिक संघामध्ये आपल्या शाळेतील सौ. साधना कारंडे-जोशी यांनी 'कवितेच्या वाटेवर' हा तुफान विनोदी कवितांचा कार्यक्रम सादर केला.

ज्येष्ठ नागरिकांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्तपणे आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. त्यांना हा कार्यक्रम खिळवून ठेवणारा, कवींच्या व कवितांच्या अनोख्या दुनियेची सफर घडवून आणणारा, तसेच पुनर्प्रत्ययाचा आनंद देणारा वाटला.

असा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या सौ. साधना कारंडे-जोशी यांना त्यांच्या पुढील कार्यक्रमासाठी शुभेच्छा!

**१२ जुलै २०१६ बोधपट**

दि. १२ जुलै २०१६ या दिवशी इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना 'सलाम बच्चे' हा चित्रपट दाखवण्यात आला. या चित्रपटातून विद्यार्थ्यांना सहकार्याची भावना, प्रामाणिकपणा, जिद्द, मोठ्यांचा आदर, श्रमसंस्कार इत्यादी संस्कारांचे जीवनातील महत्त्व पटवून दिले.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**मार्च २०१६ च्या माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल :**

| | |
|---|---|
| एकूण विद्यार्थी | – १४८ |
| परीक्षेला बसलेले विद्यार्थी | – १४८ |
| उत्तीर्ण विद्यार्थी | – १४८ |
| टक्केवारी | – १००% |
| विशेष प्रावीण्य | – ११५ |
| प्रथम श्रेणी | – ३२ |
| द्वितीय श्रेणी | – ०१ |
| तृतीय श्रेणी | – ०० |

| टक्के | सर्वोत्तम पाच विषयांतील विद्यार्थी संख्या | % |
|---|---|---|
| ९० आणि अधिक | ४७ | ३२ |
| ८०-८९ | ५७ | ३८ |
| ७०-७९ | २८ | १९ |
| ६०-६९ | १५ | १० |
| ५०-५९ | १ | १ |
| ४९ च्या खाली | ० | ० |

**पहिले दहा क्रमांक :**

| क्र . | विद्यार्थ्यांची नावे | % |
|---|---|---|
| १ | प्रज्ञा घारपुरे | ९६.०० |
| १ | शांभवी जोशी | ९६.०० |
| २ | श्रेयस बाळ | ९५.८० |
| ३ | रिद्धी खोले | ९५.६० |
| ४ | आदित्य दातार | ९५.२० |
| ४ | रुचिरा जोशी | ९५.२० |
| ५ | वरदा अवचट | ९५.०० |
| ६ | शिवानी निफाडकर | ९४.८० |
| ६ | धीर सावला | ९४.८० |
| ७ | तन्मय अंबिके | ९४.६० |
| ७ | मोहित मुसळे | ९४.६० |
| ७ | देवयानी व्यवहारकर | ९४.६० |
| ८ | सानिका गोरे | ९४.४० |
| ८ | श्रीदीप क्षीरसागर | ९४.४० |
| ८ | श्रृष्टी पोळेकर | ९४.४० |
| ८ | हर्षील बउवा | ९४.४० |
| ९ | अर्थव जोशी | ९४.०० |
| १० | अनुष्का चौबळ | ९३.८० |

**विषयातील सर्वप्रथम क्रमांक:**

| विषय | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| इंग्रजी | रिद्धी खोले | ९० |
| मराठी | शिवानी निफाडकर | ९१ |
| | वरदा अवचट | ९१ |
| संस्कृत | प्रज्ञा घारपुरे | ९९ |
| | सानिका गोरे | ९९ |
| | ओंकार वरूडकर | ९९ |
| | वरदा अवचट | ९९ |
| हिन्दी | हर्षील बउवा | ९२ |
| | ईशीता सुळे | ९२ |
| गणित | शिवानी निफाडकर | ९९ |
| विज्ञान | श्रेयस बाळ | ९८ |
| | धीर सावला | ९८ |
| | हर्षील बऊवा | ९८ |
| | रुचिरा जोशी | ९८ |
| समाजशास्त्र | प्रज्ञा घारपुरे | ९८ |
| | नेहा नवरे | ९८ |
| | श्रेयस बाळ | ९८ |
| | हर्षील बउवा | ९८ |

**वाडिया कॉलेज, पुणे आयोजित एप्रिल २०१६ महाराष्ट्र प्रज्ञा शोधचा निकाल :**

कु. शांभवी जोशी, इ. १० वी व विश्वराज बोरकर, इ.७ वी या दोन्ही विद्यार्थ्यांनी ठाणे जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला.

**एप्रिल -२०१६ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल**

राज्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालील प्रमाणे :

१) कु. कुणाल पवार २) कु. राजेश्वर देसाई
३) कु. ओंकार हाटकर

असत्य बोलणे हे तलवारीने केलेल्या जखमेप्रमाणे असते. जखम भरून येते, परंतु त्याची खूण कायम राहाते.

**संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१५-१६ चा निकाल : १००%**

परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २८

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी :

१) **मृण्मयी कानिटकर - प्रथम क्रमांक (ठाणे जिल्ह्यात)**
२) सोहम शिंपी- दुसरा क्रमांक
३) प्रथमेश वालावलकर - नऊवा क्रमांक
४) निमिशा जैन - अकरावा क्रमांक
५) पूर्वा भिडे - पंधरावा क्रमांक

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**आंतरराष्ट्रीय योग दिवस प्रचंड उत्साहात संपन्न**

आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून २०१६ रोजी सकाळी ७ ते ८ या महाविद्यालयात वेळेत साजरा करण्यात आला. महाविद्यालयात जागर जाणिवांचा अभियान, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक मंडळ, योग समिती, महिला विकास कक्ष, जिमखाना, ठाण्याचे अंबिका योग कुटीर व स्वामी विवेकानंद केंद्र ठाणे, या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने व सहकार्याने तसेच प्रत्यक्ष सहभागाने हा दुसरा आंतरराष्ट्रीय योग दिवस मोठ्या उत्साहात व प्रचंड संख्येने संपन्न झाला. यावेळी एन. सी. सी., N.S.S. चे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असे २५० जण योगाभ्यासात सहभागी झाले होते. स्वामी विवेकानंद केंद्राच्या सुरभी जोशी यांनी सर्वांकडून शांतपणे, लयबद्ध व सौंदर्यपूर्ण पद्धतीने तसेच आपल्या शांत व संदन आवाजात योगासने करून घेतली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी उपप्राचार्य व अंबिका योग कुटीराचे योग शिक्षक डॉ. आठल्ये हे उपस्थित होते. प्रभारी प्राचार्य डॉ. मनोहर न्यायते हे सुद्धा प्रत्यक्ष योग साधनेत सहभागी झाले होते.

गेली १४ वर्षे महाविद्यालयांत रितसर योगवर्ग चालू आहेत. अकरावी पासून पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी हे योगशिक्षण अखंडपणे व अविरत चालू आहे. स्वामी विवेकानंद केंद्र-ठाणे यांच्यातर्फे **'दैनंदिन योग'** या पुस्तकाचे प्रकाशन यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. आठल्ये यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विवेकानंद केंद्राचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. ''योग आपल्या सवयीचा भाग बनला पाहीजे व तो आपल्या नित्यसाधनेचा अभ्यास झाला पाहिजे'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

''योगाचे आचरण दैनंदिन जीवनात विद्यार्थ्यांनी कटाक्षाने करावयास हवे तरच पुढील भविष्यात निरोगी व निकोप पद्धतीने जगता येईल'' असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजनेचे अधिकारी प्रा. भालचंद्र मांडलेकर यांनी केले.

**''थ्रीडी प्रिंटिंग टेक्नॉलॉजी'' (त्रिमितीय मुद्रण तंत्रज्ञान) या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन**

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भविष्यातील सर्वाधिक आव्हानात्मक अशा त्रिमितीय मुद्रण (3D Printing) या शास्त्रकलेची जवळून ओळख व्हावी व त्यातील नवीन आव्हानांना व सुविधांना उद्याची पिढी तयारीनिशी सामोरी जावी म्हणून भौतिकशास्त्र विभागाने याच विषयावरील कार्यशाळेचे आयोजन दि.२५ जून रोजी केले होते.

या कार्यशाळेसाठी Melting Mints, Mumbai चे संस्थापक समर्थ शाह व Melting Mints मुंबई चे बिझनेस डेव्हलप्मेन्ट मॅनेजर कुणाल आंबेकर ह्या दोन मंडळीनी तज्ज्ञ म्हणून मार्गदर्शन केले. 'भविष्यातील तंत्रज्ञान समजून घ्यायचे असेल तर अशा प्रकारच्या कार्यशाळांची गरज आहे', असे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. न्यायते यांनी सर्वांना सांगितले.

**"Physiology Practical Book for S.Y.B.Sc." या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा**

"Physiology Practical Book for S.Y.B.Sc." या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा दि. २७ जून २०१६

रोजी पार पडला. या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. सी. जी. पाटील, निवृत्त प्राचार्य, बांदोडकर महाविद्यालय व डॉ. स्मिता दुर्वे विभागप्रमुख, एस. आय. ई. एस. महाविद्यालय व अध्यक्ष प्राणिशास्त्र अभ्यास मंडळ-मुंबई विद्यापीठ यांच्या हस्ते संपन्न झाले.

या पुस्तकाचे लिखाण प्रा. विनायक दळवी, विभागप्रमुख, मिठीबाई महाविद्यालय, डॉ. विंदा मांजरमकर, सहयोगी प्राध्यापक, बांदोडकर महाविद्यालय आणि डॉ. शैलेश तावडे, सहाय्यक प्राध्यापक, पाटकर महाविद्यालय या तिघांनी केले आहे.

या पुस्तकाच्या सहलेखिका डॉ. विंदा मांजरमकर या बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या पुस्तकाच्या लिखाणाकरता त्यांनी घेतलेल्या अविरत परिश्रमाचे कौतुक डॉ. सी. जी. पाटील यानी यावेळी केले. या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना विषय समजून घेण्याकरीता अधिकाधिक फायदा होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या पुस्तकाचे लेखक प्रा. विनायक दळवी, विभागप्रमुख, मिठीबाई महाविद्यालय यांनी यावेळी बोलताना असे मत व्यक्त केले की, या पुस्तकाचे लिखाण जरी तीन लेखकांनी केले असले तरी देखील या पुस्तकाकरिता अनेक प्राध्यापकांनी आपला बहुमूल्य वेळ खर्च करून पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट बनवण्याचा प्रयत्न केला आहे.

**सिंधू स्वाध्याय**

२०१६ हे वर्षे विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. वा. ना. बेडेकर यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने बांदोडकर महाविद्यालयातर्फे व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले आहे.

या व्याख्यानमालेतील दुसरे व्याख्यान २७ जून २०१६ रोजी महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात संपन्न झाले.'सिंधू स्वाध्याय' यावर प्रा. विनायक दळवी यांनी व्याख्यान दिले.

यावेळी बोलताना सिंधू स्वाध्याय केंद्र याबाबतची माहिती त्यांनी दिली. यामध्ये या संस्थेचा उगमापासून ते त्याचे नाव कसे पडले याबाबत रूचकर शब्दात त्यांनी त्यांचे विचार मांडले. या अभ्यासक्रमांचे स्वरूप देखील त्यांनी मोजक्या शब्दात समजावून सांगितले. तसेच डॉ. प्रसाद कर्णिक, पदाधिकारी, मुंबई विद्यापीठ, ठाणे उपकेंद्र यांनी यावेळी बोलताना सिंधू स्वाध्याय याचा अर्थ सांगून याबाबत अभ्यासक्रमाची थोडक्यात माहिती दिली.

ह्या अभ्यासक्रमांमध्ये काम करण्याची एक उत्कृष्ट संधी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्राचार्यांचा करिअर विषयी महाजागर**

जागर जाणिवांच्या अभियानाच्या उद्घाटनपर भाषणाचे आयोजन दि. ७ जुलै रोजी 'तुम्हीच तुमच्या करिअरचे शिल्पकार' (You are the master of your career) या विषयावरील विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरील एका महत्त्वाच्या व्याख्यानाचे आयोजन पतंजली सभागृहात करण्यात आले.

प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर नुकत्याच चार महिने ऑस्ट्रेलिया विद्यापीठाची फेलोशिप मिळवून संशोधन करून परतल्या असतानाच तेथील विद्यापीठातील विद्यार्थी व व्यावसायिक संधी आणि भारतीय विद्यार्थी आणि त्यांची मानसिकता अशा तुलनात्मक अभ्यासाने काही निष्कर्षाप्रत आलेल्या डॉ. पेजावर यांनी विद्यार्थ्यांना काही उदाहरणे देत अंतर्मुख केले.

''आपण छोट्या-छोट्या उद्दीष्टांपासून मोठ्या उद्दीष्टांपर्यंत पोहोचणे हे यशस्वी जीवनाचे गमक आहे. भारतात फक्त लोकांनी 'वेळ' पाळली तरी उद्याचा भारत वेगळा दिसेल. एका भारतीयाने कचरा टाकणार नाही किंवा फक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ठरवले की कचरा टाकणार नाही किंवा रस्त्यावर थुंकणार नाही तरी पाच वर्षांनी देशाचे चित्र फारच वेगळे दिसेल आणि

ही शिस्त आपण स्वतःहून लावून घ्यायला हवी. तसेच आयुष्यात Goad Setting हे फार महत्त्वाचे आहे. कारण एकदा काय करायचे हे नक्की झाले की त्यादृष्टीने प्रयत्न होण्यास सुरुवात होते व आपले इप्सित साध्य होते.'' असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. पेजावर यांनी यावेळी केले.

**गुरुपौर्णिमेच्या दिवशी उमगली जिवनाची गुरुकिल्ली**

सुखी जिवनाची गुरुकिल्ली म्हणजे आनंदी जगणं! पण आनंदी जिवनाचं गमक सांगत विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात अनोख्या ढंगात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

यावेळी डॉ. शुभांगी पारकर, माजी प्रभारी अधिष्ठाता, जी. एस. मेडिकल महाविद्यालय यांच्या प्रभावी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर सहकाऱ्यांसाठी या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पारकर यांनी सगळ्यांनाच अनेक उदाहरणे देत सुखी जीवन जगण्याचा मंत्र दिला. नेहमीच्या तणावाच्या आणि धकाधकीच्या आयुष्यात येणाऱ्या प्रसंगाना कसे तोंड द्यावे याबद्दल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर व उपप्राचार्य डॉ. ए. पी. पाटील यांसह महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्याप्रमाणात उपस्थित होते. बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबतच नेहमीच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांसाठीही वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. हलक्या फुलक्या पद्धतीत मानसोपचार तज्ज्ञांकडून आनंदी जीवन जगत आयुष्यातील कामाचा ताण कसा कमी करता येईल या उद्देशाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्याना नंतर सगळ्यांचे हसरे चेहरे आणि जीवनाकडे बघण्याचा सकारात्मक दृष्टीकोन याने या व्याख्यानाची आणि ओघाने गुरुपौर्णिमेच्या दिवसाची शोभा वाढवली.

•••

(पृष्ठ क्र. ६ वरून - **लंडन मधील इंडिया हाऊस**)

किलोमीटर पुढे जाऊन उतरलो. थोडे चालल्यावर आम्ही इच्छित स्थळी पोहोचलो. शामजी जेथे राहात त्या घरावर देखील फलक लावलेला आहे. परंतु हा फलक लंडन कौन्सिलने लावला नसून काही भारतीय लोकांनी लावलेला आहे. त्यामुळे, त्याचा आकार आणि रंग दोन्ही नील फलकाहून वेगळे होते. या फलकाचे चित्र खाली दिलेले आहे.



**शामजींच्या घरावर असलेला फलक**

शामजींच्या कार्याचे कौतुक करीत आम्ही परत बसस्थानकावर आलो. लवकरच रेल्वे स्थानकावर जाणारी बस आली. त्याने आम्ही आर्चवे स्टेशनला परत आलो आणि पुढे भुयारी मार्गाने आमच्या राहत्या ठिकाणी पोहोचलो. इतिहासाची साक्ष देत दिमाखात उभ्या असलेल्या इमारतीचे दर्शन घेऊन समाधानी चेहऱ्याने आम्ही परत आलो होतो. लंडनला जाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या स्थळाला आवर्जून भेट द्यावी असे सांगावेसे वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण–शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे – ४२१२०४

•••

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)

आले. २००४ ते २०१६ या तेरा वर्षांच्या कालावधीत १५ हून जास्त सहली आम्ही आयोजित केल्या. १०० हून अधिक शिक्षक, ७० हून अधिक विद्यार्थी आणि ३० हून अधिक पालक यानी या सहलीचा फायदा घेतला. त्यातील प्रत्येक व्यक्ती विविध अनुभव घेऊन परत आली. या सहलींमुळे केवळ त्यांच्या ज्ञानात भर पडली असे नाही, तर त्यांच्या मनोवृत्तीत देखील बदल झालेला आम्हाला पाहायला मिळाला. सहलीत सहभागी झालेल्या सभासदांनी सहलीच्या उपयुक्ततेसंबंधी व्यक्त केलेली मते फारच बोलकी आहेत. काही जणांनी सांगितले की, त्यांना इंग्रजांचा वक्तशीरपणा आवडला; तर काही जणांनी त्या देशातील स्वच्छतेचे कौतुक केले. काहींनी संग्रहालये ही विद्यालये कशी आहेत हे नमूद केले तर काहींनी तेथील वाहतूक व्यवस्थेचे गुणगान केले. इंग्लंड सहल आता दरवर्षी मे महिन्याच्या सुट्टीत आयोजित करण्यात येते.

**कास्टिक, चीन**

२००७ सालच्या फेब्रुवारी महिन्यात बीजिंग येथून काही चिनी अधिकारी भारतीय दौऱ्यावर आले होते. विज्ञान शिक्षण आणि संशोधन याचा प्रचार आणि प्रसार व्हावा या उद्देशाने त्या देशात 'चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना' (China Association of Science and Technology) स्थापन करण्यात आली आहे. थोडक्यात, या संघटनेला 'कास्ट' (CAST) असे संबोधले जाते. भारतीय दौऱ्यावर आलेले पदाधिकारी याच संघटनेचे सभासद असून त्यांना भारतीय शाळांमध्ये विज्ञान कसे शिकवितात हे पाहायचे होते. ठाण्यातील सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेला त्यांनी भेट दिली. या शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला उत्तेजन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. विद्यार्थ्यांनी केलेले विविध वैज्ञानिक प्रकल्प शाळेतील शिक्षकांनी पाहुण्यांना दाखविले. ते बघून कास्टचे अधिकारी बरेच खूश झाले. त्यांनी त्यांच्या संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या 'विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत' सहभागी होण्याचे निमंत्रण ताबडतोब दिले. तोंडी निमंत्रणावर न थांबता बीजिंगला परत गेल्यावर जुलै २००७ मध्ये होणाऱ्या विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रीतसर लेखी निमंत्रण त्यांनी 'विद्या प्रसारक मंडळा'ला पाठवले. कास्ट मध्ये विद्यार्थी आणि तरुणांसाठी एक वेगळा विभाग आहे. या विभागाच्यावतीने किशोरवयीन मुलांसाठी विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेला China Adolescents Science and Technology Innovation Contest थोडक्यात CASTIC म्हणजेच कास्टिक असे म्हणतात. १९७९ मध्ये या स्पर्धेची सुरुवात झाली. आधीच्या काळात दर दोन वर्षांनी ही स्पर्धा आयोजित करण्यात येत असे. १९९१ पासून मात्र ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येऊ लागली. २००७ मध्ये आयोजित केलेली स्पर्धा २२वी होती. यासाठी कुनमिंग या सुंदर शहराची निवड करण्यात आली होती. कुनमिंग हे चीनच्या दक्षिणेला असलेले एक समृद्ध असे शहर आहे. शहरभर रस्त्याच्या दुतर्फा फुलांचे ताटवे दिसतात. आम्ही विज्ञानाचा एक प्रकल्प घेऊन गेलो होतो. या प्रकल्पाला विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

एकदा सुरुवात झाल्यापासून सलग दहा वर्षे आम्ही या स्पर्धेत सहभागी होत आहोत. ह्या दहा स्पर्धा देशाच्या वेगवेगळ्या भागात आयोजित करण्यात आल्या. तेविसावी स्पर्धा देशाच्या उत्तर पश्चिमेला असलेल्या उरूमची या शहरात तर चोविसावी स्पर्धा देशाच्या पूर्व भागात असलेल्या जिनान या शहरात आयोजित करण्यात आली होती. पंचविसाव्या स्पर्धेसाठी देशाच्या दक्षिणेला

असलेल्या गांग्चू या ऐतिहासिक शहराची निवड करण्यात आली होती. सव्विसावी स्पर्धा मंगोलियाच्या जवळ असलेल्या होहोट शहरात तर सत्ताविसावी स्पर्धा त्याच्याच शेजारच्या राज्यातील यिंचियान या शहरात भरविण्यात आली होती. एकोणतिसाव्या स्पर्धेसाठी देशाच्या राजधानीची म्हणजे बीजिंगची तर तिसाव्या स्पर्धेसाठी हांगकांगची निवड करण्यात आली. एकतिसावी कास्टिक स्पर्धा १३ ते १६ ऑगस्ट २०१६ या कालावधीत शांघाय शहरात आयोजित करण्यात आली होती.

आम्ही प्रत्येक स्पर्धेला चार विद्यार्थी घेऊन जात असतो. या हिशोबाने मागील दहा वर्षात सौ. आनंदीबाई जोशी या शाळेत शिकणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना चीनची सहल करता आली. या सहली शैक्षणिक दृष्टीने फारच महत्त्वपूर्ण ठरल्या. सहभागी विद्यार्थ्यांना जगाच्या वेगवेगळ्या भागांतून आलेल्या त्यांच्याच वयाच्या मुलांशी मैत्री करता आली. त्यांनी आणलेले विज्ञान प्रकल्प पाहता आले. त्याचबरोबर आजूबाजूला असलेली प्रेक्षणीय स्थळे पाहता आली. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे चीनने मागील दोन दशकात केलेली नेत्रदीपक प्रगती त्यांना जवळून पाहता आली. यातून जे शिक्षण झाले त्याचे मोजमाप करणे अशक्य आहे.

**मोस्ट्राटेक, ब्राझील**

चीनप्रमाणेच ब्राझील मध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी मोस्ट्राटेक नावाची स्पर्धा आयोजित करण्यात येते. नोवो हँबुर्गो या शहरातील फंडासाव लिबरेंटो ही तंत्र शिक्षण देणारी संस्था या स्पर्धेचे आयोजन करते. या संस्थेच्या निमंत्रणावरून सौ. आनंदीबाई जोशी शाळेतील दोन विद्यार्थी घेऊन आम्ही २०१३ सालच्या ऑक्टोबर महिन्यात ब्राझीलला गेलो. या निमित्ताने दक्षिण अमेरिकेतील या स्पर्धेत भारताचा ध्वज पहिल्यांदाच फडकला. आमच्या प्रकल्पाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. प्रत्यक्ष कृतीवर आधारित हा प्रकल्प असल्याने त्याच्याजवळ सतत गर्दी असायची. स्पर्धेचे मूल्यमापन करून त्याला विशेष पारितोषिक देण्यात आले. त्याच्या पुढच्या वर्षी निमंत्रण असून देखील आम्ही स्पर्धेत सहभागी होऊ शकलो नाही. २०१५ च्या ऑक्टोबर मध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांचा प्रकल्प घेऊन आम्ही पुन्हा ब्राझीलला गेलो. आधीच्या प्रकल्पाप्रमाणे या प्रकल्पाला देखील चांगला प्रतिसाद मिळाला. परीक्षकांनी या प्रकल्पाची तिसऱ्या पारितोषिकासाठी निवड केली. २०१६ सालच्या ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या स्पर्धेचे निमंत्रण विद्या प्रसारक मंडळाला मिळाले आहे. त्यात सहभागी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

ब्राझील भेट ही केवळ मुलांसाठीच नाही तर आमच्यासाठी देखील नवीन होती. भारतावर जसे इंग्लंडने राज्य केले तसे पोर्तुगालने ब्राझीलवर राज्य केले. परकीय राजवटीतून मुक्त झाल्यानंतर भारताने जशी प्रगतीची वाट चोखाळली तशीच ब्राझीलने देखील चोखाळली. त्यामुळे या दोन देशांमध्ये खूप साम्य आहे. प्रगतीकडे वेगाने वाटचाल करणारे देश म्हणून या दोन्ही देशांचा उल्लेख होतो. परस्पर सहकार्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ब्रिक्स (BRICS) या संघटनेचे हे दोन्ही देश सभासद आहेत. साव पावलो हे ब्राझीलमधील सर्वात मोठे शहर आहे. मोस्ट्राटेक ही स्पर्धा मात्र साव पावलोच्या दक्षिणेला असलेल्या नोवो हँबुर्गो या शहरात भरते. जर्मनी मध्ये हँबुर्ग नावाचे शहर आहे. या शहरातील काही लोक १९३० च्या दशकात येथे येऊन स्थायिक झाले. आपल्या मूळ गावाच्या नावावरून त्यांनी या गावाला न्यू हँबुर्ग असे नाव दिले. पोर्तुगीज भाषेच्या प्रभावामुळे त्याचे नोवो हँबुर्गो असे रूपांतर झाले. चामडी वस्तूंच्या निर्मितीसाठी हे गाव प्रसिद्ध आहे. दरवर्षी करोडो रियालच्या पादत्राणांची या गावातून निर्यात होते.

नोवो हँबुर्गो या शहरात फंडासाव लिबरेंटो ही शालेय शिक्षणानंतर तांत्रिक शिक्षण देणारी खाजगी संस्था आहे. आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला उत्तेजन मिळावे या उद्देशाने या संस्थेने तीस वर्षांपूर्वी मोस्ट्राटेक स्पर्धेची सुरुवात केली. एका संस्थेपुरती मर्यादित असलेल्या या स्पर्धेची व्याप्ती प्रथम गावभर नंतर जिल्हाभर पसरली. काही वर्षांतच तिला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. आता ती एक महत्त्वाची आंतरराष्ट्रीय स्पर्धा म्हणून ओळखली जाते. ब्राझील खेरीज सुमारे २५ देश यात सहभागी होतात. त्यामध्ये अर्थातच दक्षिण अमेरिकेतील देशांचा भरणा जास्त असतो. त्याचबरोबर, युरोप आणि आशिया खंडातील देश देखील या स्पर्धेत सहभागी होतात.

**उंगे फोर्सकेरे, डेन्मार्क**

डेन्मार्क मध्ये उंगे फोर्सकेरे नावाची तरुण शास्त्रज्ञांची एक संघटना आहे. ही संघटना वर्षातून एकदा डॅनिश तरुण शास्त्रज्ञांचा मेळावा (Danish Young Scientist Fair) आयोजित करते. या संघटनेचे निमंत्रण देखील विद्या प्रसारक मंडळाला प्राप्त झाले. त्यानुसार बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील दोन विद्यार्थी घेऊन मी एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कोपनहेगला जाऊन आलो. बी. एस्सी. च्या शेवटच्या वर्षाला शिकणारे हे विद्यार्थी होते. त्यांनी प्रदर्शित केलेल्या प्रकल्पाला चांगला प्रतिसाद मिळाला. आंतरराष्ट्रीय प्रकल्पातून त्याची तिसऱ्या क्रमांकाच्या बक्षिसासाठी निवड झाली.

डॅनिश तरुण शास्त्रज्ञांच्या मेळाव्यात डेन्मार्क खेरीज इतर अनेक युरोपियन देशाचे प्रतिनिधी होते. त्याचबरोबर भारताखेरीज आशिया खंडातील इतर देश होते. या सर्वांची राहण्याची व्यवस्था एकाच हॉटेलमध्ये करण्यात आली होती. अगदी सकाळच्या न्याहारीपासून संध्याकाळच्या जेवणापर्यंत आम्ही सगळेजण एकत्र राहात असू. त्यामुळे आपापसात चांगली आंतरक्रिया झाली. एकमेकांच्या देशाबद्दल आणि चालीरीतींबद्दल सखोल माहिती मिळविता आली. मेळाव्याचा एक दिवस त्यांनी सहलीसाठी राखून ठेवला होता. त्या दिवशी आयोजकांनी आम्हाला कोपेनहेगन शहरातील काही महत्त्वाची ठिकाणे दाखविली. त्यातून आमच्या ज्ञानात चांगलीच भर पडली. एका आठवड्याच्या डेन्मार्क भेटीतून बऱ्याच नवीन गोष्टी आम्हाला शिकता आल्या. २०१७ मध्ये भरणाऱ्या मेळाव्याचे विद्या प्रसारक मंडळाला आत्ताच निमंत्रण मिळाले आहे. त्या निमित्ताने बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डेन्मार्कला जाण्याची आणि तरुण शास्त्रज्ञांच्या मेळाव्यात सहभागी होण्याची संधी प्राप्त झाली आहे.

**औद्योगिक सहल, सिंगापूर**

विद्या प्रसारक मंडळ ठाणे इतर अनेक संस्थाबरोबरच 'व्यवस्थापन संस्था' देखील चालविते. शिक्षण झाल्यानंतर हे विद्यार्थी वेगवेगळ्या उद्योगांत कामाला लागतात. या कामासाठी त्यांची तयारी करून घेण्याच्या दृष्टीने औद्योगिक सहल आयोजित केली जाते. विद्या प्रसारक मंडळाने चालविलेल्या डॉ वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेतील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अनुभव मिळावा या उद्देशाने त्यांची सिंगापूर सहल आयोजित करण्यात आली होती. या सहलीत वेगवेगळ्या उद्योगांना भेट देण्याची आणि तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याची संधी त्यांना मिळाली. मागील वर्षी आयोजित केलेल्या या भेटीचा अनुभव खूपच उत्साहवर्धक होता. म्हणून या भेटी आता नियमितपणे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार २०१६-२०१८ या शैक्षणिक वर्षासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची औद्योगिक भेट ऑक्टोबर २०१६ मध्ये ठरविण्यात आली आहे.

इंग्लंड, चीन, ब्राझील, डेन्मार्क, सिंगापूर देशांना भेट देण्याची संधी विद्या प्रसारक मंडळाच्या संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्माण करण्यात आली आहे. याखेरीज, मंडळाच्या वतीने जपानी विद्यार्थ्यांची भारत भेट आयोजित केली जाते. जपानच्या क्योटो सँगो विद्यापीठात आशिया संस्कृतीचा अभ्यास करणारे विद्यार्थी दरवर्षी दोन आठवड्यांसाठी ठाण्याला येतात. त्यांच्याशी जवळीक साधण्याची संधी ठाणे महाविद्यालय परिसरातील विद्यार्थ्यांना मिळते. २०१२ पासून दरवर्षी जपानी विद्यार्थ्यांचा एक चमू ठाण्याला भेट देत आहे. त्यांच्या सोबत येणाऱ्या प्राध्यापकांनी जपान भेटीचे निमंत्रण मंडळाला दिले आहे. त्यानुसार २०१६ मध्ये विद्यार्थ्यांची जपान सहल आयोजित करण्याची योजना आखण्यात आली आहे.

एकेक करीत मंडळातील आंतरराष्ट्रीय कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत जात आहे. या सगळ्या कामांमध्ये समन्वय साधण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने मंडळाने २००९ साली 'आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन संस्था' (VPM's Academy of International Education and Research) स्थापना केली आहे. टाटा मूलभूत संशोधन संस्थेतून निवृत्त झाल्यानंतर जुलै २०१३ पासून मी या संस्थेची जबाबदारी घेतली आहे. या संस्थेला विद्या प्रसारक मंडळाच्या इतर संस्थांचे (विभागांचे) चांगले सहकार्य मिळत आहे. त्याचबरोबर, संस्थेच्या विविध कार्यक्रमांना मिळणारा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद देखील उत्तम आहे. सगळ्यात कौतुक करावे ते पालकांचे. आपल्या पाल्याला चार भिंतींबाहेरचे शिक्षण मिळावे यासाठी आर्थिक झड सोसण्याची पालकांची तयारी आहे हे आवर्जून नमूद करावेसे वाटते. विद्या प्रसारक मंडळातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांचे असेच सहकार्य मिळत राहिले तर भविष्यात मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय सहलींचे आयोजन करणे या संस्थेला शक्य होईल. वि. प्र. मं. चा आंतरराष्ट्रीय विभाग केवळ मंडळाच्या संस्थेसाठी काम करतो असे नाही, तर इतर शैक्षणिक संस्थांच्या विनंतीवरून त्यांना देखील या संस्थेने मदतीचा हात दिलेला आहे. बारामती शहरात कार्यरत असलेल्या विद्या प्रतिष्ठान या शैक्षणिक संस्थेच्या विनंतीवरून त्या संस्थेच्या सर्व शाळांच्या प्राचार्यांसाठी सिंगापूरची एक विशेष शैक्षणिक सहल २०१५ च्या एप्रिल महिन्यात आयोजित करण्यात आली होती. त्याचबरोबर, महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळाच्या सभासदांसाठी दोनदा सिंगापूर सहलींचे आयोजन करण्यात आले. त्यांच्या विनंतीवरून लवकरच तिसऱ्या सहलीचे आयोजन केले जाणार आहे. विशाखापट्टणम येथील श्री प्रकाश विद्या निकेतन या संस्थेने विज्ञान आणि गणित मेळाव्याचे आयोजन करण्यासाठी मार्गदर्शन करण्याची विनंती केली होती. त्यांना २०१२ आणि २०१४ साली शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय विज्ञान आणि गणित मेळावा (International Children's Science and Mathematics Festival) आयोजित करायला या संस्थेने सर्वतोपरी सहकार्य केले आहे. याच सहकार्यातून नोव्हेंबर २०१६ मध्ये आणखी एक आंतरराष्ट्रीय मेळावा साकारणार आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.